follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 ⁂ वर्ष २५ ⁂ अंक २०२ ⁂ सातारा ⁂ रविवार, दि. ३१ मार्च २०२४ ⁂ पाने ६ (सुप्रभात) ⁂ किंमत ५/- रूपये

# 'पॉर्न व्हिडीओ' तयार करणारी टोळी गजाआड

## लोणावळा ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई; ५ महिलांसह १८ जण ताब्यात



**राजदंड / वडगाव मावळ**

**मावळ तालुक्यातील लोणावळ्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अश्लील व्हिडीओ तयार करणाऱ्या टोळीला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून लोणावळ्यातील एका 'व्हीला'वर हा प्रकार सुरू होता. देशातील वेगवेगळ्या राज्यांमधून तरुण आणि तरुणी एकत्र आले होते. अश्लील व्हिडीओ तयार करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर लोणावळा ग्रामीण पोलिसांनी छापा टाकला. यामध्ये पोलिसांनी ५ महिलांसह १३ जणांना अटक केली असून दोघे फरार आहेत. त्यांचा शोध घेतला जात आहेत.**

याप्रकरणी लोणावळा ग्रामीणचे पोलीस उप निरीक्षक भारत भोसले यांनी सरकारी फिर्याद दिली आहे. यानुसार विश्णु मुन्नासाहब साओ (वय-३०, रा.१६ परगना, कोलकत्ता), जावेद हबीबुल्ला खान (वय-३५, रा. आहरा उमरी, जि. बस्ती, उत्तरप्रदेश), अलका राज के राजन (वय २३, रा. आरपी, साउथ वेस्ट दिल्ली), नेहा सोमपाल वर्मा (वय ३८, रा. गणेशपुरी, मुजफानगर, उत्तरप्रदेश), रिया वासु गुप्ता (वय २१, रा. लक्ष्मीनगर, शखरपुर, दिल्ली), बुध्दसेन बरदानीलाल श्रीवास (वय-२९, रा. महाकाली कॉलनी, चंद्रपुर), समीर मेहताब आलम (वय २६, रा. अमरोहा, राईड मॉक्सी, उत्तरप्रदेश), अनुप मिथीलेष चौबे (वय २९, रा. काशीबाई चाळ कांदिवली ईस्ट, मुंबई), रामकुमार श्रीभगवान यादव (वय २१, रा. रोनक सिटी, शाम कॉलनी, हरियाणा), विना भारत पोवळे (वय ३२, रा. केंगार चाळ, खोपट, ठाणे), मैनाज जाहीद हुसेन खान (वय २८, रा. सनसिटी, नालासोपारा वेस्ट, जि. पालघर), राहुल सुरेश नेवरेकर (वय ३८, रा. मोहनचाळ, वागळे इस्टेट, ठाणे), अनिकेत पवन शर्मा (वय १९, व्यवसाय मेकअप आर्टीस्ट, रा. रूद्राक्ष रेसिडेन्सी, पलसाना, सुरत, राज्य गुजरात), वंशज सचीन वर्मा (वय २१, रा. डेहराखास, डेहराडुन), मनीश हिरामण चौधरी (वय २०, रा. शास्त्रीनगर, हरीयाणा) यांच्यासह बंगला चालक सुखदेव चांगदेव जाधव (वय ५२, रा. मळवली, ता. मावळ), आकेष गौतम शिंदे (वय ३२, रा. मळवली, ता. मावळ) व सनी विलास शेंडगे (वय ३५, रा. मळवली, ता. मावळ, जि.पुणे) यांच्या विरोधात सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि ३० रोजी प्रभारी अधिकारी किशोर धुमाळ यांना गोपिनिय बातमी मार्फत माहिती मिळाली की काही इसम व महिला आर्थिक फायदा करिता मावळ तालुक्यातील पाटण गावच्या हद्दीत बंगला भाड्याने घेऊन त्यामध्ये पुरूष व स्त्रिया संभोग करताना नग्न अश्लिल चित्रीकरण करताना व सदरचे अश्लील व्हिडिओ विविध अवैध वेबसाईटवर तसेच मोबाईल ॲप्लिकेशनवर अपलोड करून अशी मजकूर (पान २ वर)

### गुरू-शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारी घटना

## कुस्तीमध्ये करिअर घडविण्याचे आमिष दाखवून कुस्तीपटू तरुणीचे लैंगिक शोषण

**राजदंड / भोर**

आजही समाजात गुरुकडे आदराने पाहिले जाते मात्र गुरु व शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारी घटना भोर येथे घडली असून गुरुनेच शिष्याला कुस्तीमध्ये करिअर घडविण्याचे आणि लग्नाचे आमिष दाखवून २१ वर्षीय कुस्तीपटू तरुणीचा वेळोवेळी जबरदस्तीने विनयभंग करत लैंगिक शोषण केल्या प्रकरणी संबंधित तरुणीने शुक्रवार (दि.२९) रोजी भोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने भोर मधील नामांकित कुस्तीसंकुलाच्या संचालक तथा प्रशिक्षक यास भोर पोलिसांनी अटक केली आहे.

**भोर येथील घटना**

सुनिल विठ्ठल शेटे (वय ५३ रा. संजयनगर भोर) असे अटक केलेल्या कुस्ती प्रशिक्षकाचे नाव असून त्याने मागील चार महिन्यामध्ये २१ वर्षीय महीला कुस्तीपटूस वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले.

भोर पोलिसांनी दिलेली माहिती नुसार भोर मधील एका नामांकित कुस्ती संकुलाचा संचालक तथा प्रशिक्षक असणाऱ्या सुनिल शेटे याने कुस्तीपटू तरुणीला लग्नाचे व कुस्तीमध्ये करिअर घडविण्याचे आमिष दाखवून डिसेंबर २३ ते मार्च २४ या दरम्यान महाबळेश्वर येथील हॉटेल रेनफॉरेस्ट व सातारा जिल्हा परिसरातील लॉजवर चारचाकी मोटारीतून घेऊन जाऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले तसेच सदर प्रकार कोणास सांगितलास तर तुझे करिअर बरबाद होईल अशी धमकी दिली याशिवाय मोटारीतून कुस्ती संकुलात घेऊन येताना वेळोवेळी तिचा विनयभंग केला आहे अशा आशयाची फिर्याद पिडीत तरूणीने दिली असल्याने भोर पोलिसांनी आरोपी सुनिल शेटे यास शुक्रवारी सायंकाळी अटक केली आहे.

पुढील तपास भोर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक आण्णासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिला खोत करीत आहेत.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा धनगरी घोंगडी देवून सत्कार

**राजदंड / बारामती**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इंदापूर तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने धनगरी घोंगडी देऊन सत्कार करण्यात आला.

लोकसभेची आचारसंहितेनंतर राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला असून, बारामती लोकसभेकडे संपुर्ण महाराष्ट्राचे विशेष लक्ष लागले आहे. भारतीय जनता पक्षाने मागील वर्षांत संपूर्ण लक्ष या मतदारसंघावर केंद्रित केले होते; परंतु अनपेक्षितपणे अजित पवार हे भारतीय जनता पक्षाबरोबर आले व पारंपरिक राजकीय विरोधक असलेल्या नेत्यांना एकत्र काम करण्याची वेळ आली.

इंदापूर विधानसभेत अद्याप नेते मंडळींचे मनोमिलन झाले नाही. ते होण्यासाठी पक्षांच्या खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या 'सागर बंगला' या मुंबई येथील निवासस्थानी इंदापूर तालुक्यातील भाजपा कार्यकर्त्यांची बैठक घेतली. महायुती कडून जो उमेदवार दिला जाईल, त्या उमेदवाराचा सर्वांनी प्रचार करुन विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी राष्ट्रीय साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वात,पृथ्वीराज जाचक, गजानन वाकसे, नाना शेंडे, लाला पवार,बाबा महाराज खारतोडे,शेखर पाटील आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर फडणवीस यांनी आपल्या मनोगतात सांगितले की इंदापूर तालुक्यातील भाजपा (पान २ वर)



# 'सुरूची'वर 'जादू की झप्पी'

**राजदंड / सातारा**

**सातारा जिल्ह्याच्या राजकारणात 'दोन ध्रुवांवर दोघे आपण', अशी राजकीय समीकरणे रंगवणारे खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यामध्ये राजकारणविरहित बंधूभाव शनिवारी पाहायला मिळाला. खासदार उदयनराजे भोसले यांनी थेट सुरूची येथे जाऊन आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी महाराष्ट्राचे व जिल्ह्याचे नेतृत्व करावे, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. उदयनराजे यांच्या शुभेच्छांमुळे मला दहा हत्तींचे बळ आल्याची भावना यावेळी शिवेंद्रसिंहराजे यांनी व्यक्त केली.**

सातारा शहराच्या राजकारणामध्ये एकमेकांवर राजकारणाच्या निमित्ताने भरपूर तोंडसुख घेणारे दोन्ही राजघराण्यातील सदस्य आज मात्र आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त एकत्र आले. खासदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना उदयनराजे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे वाढदिवसानिमित्त अभिनंदन केले. यावेळी त्यांच्यासमवेत लोकसभा संयोजक सुनील काटकर उपस्थित होते. उदयनराजे भोसले यांनी यावेळी लहानपणीच्या आठवणी जागवल्या. यांच्यासाठी लहानपणी मी खूप मार खाल्ला आहे, असे सांगताच उपस्थितांमध्ये हशा पिकला. या भेटीचा कोणीही राजकीय अर्थ काढू नये, राजकारण वेगळे असते आणि घरातली नाती वेगळी असतात, असे उदयनराजे यांनी आधीच स्पष्ट केले. आपल्याला उदंड आयुष्य व यश मिळो, तसेच आपल्या राजकीय वाटचालीमध्ये आपण जिल्ह्याचे तसेच महाराष्ट्राचे नेतृत्व करावे, अशा अपेक्षा व्यक्त करत उदयनराजे यांनी शिवेंद्रसिंहराजे यांना 'जादू की झप्पी' दिली.

यावेळी बोलताना शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, राजघराण्यातील ज्येष्ठ सदस्य या नात्याने बंधू उदयनराजे यांच्या शुभेच्छांमुळे मला दहा हत्तींचे बळ आले आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मी कायम त्यांच्याबरोबर आहे. केंद्रातील वरिष्ठ कार्यकारिणीने सातारा लोकसभेच्या जागेबाबत काय निर्णय घेतला आहे हे मला ठाऊक नाही, पण सातारा-जावली मतदारसंघात रमणारा मी कायम त्यांच्याबरोबर आहे. त्यांनी तिकिटासंदर्भात प्रयत्न केले आहेत, त्यांची खात्री आहे, अशा शब्दात शिवेंद्रसिंहराजे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. उदयनराजे व शिवेंद्रसिंहराजे यांना एकत्र बघून साताऱ्यात मनोमीलनाचे वारे वाहू लागले आहे, अशा राजकीय चर्चांना सुरूवात झाली आहे. निरोप घेताना उदयनराजे यांनी शिवेंद्रसिंहराजे यांच्या गालाचे चुंबन घेतले. तसेच त्यांची दाढी मला टोचते, असा विनोद केल्याने पुन्हा एकदा हशा पिकला. वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन उदयनराजे राजकीय बेरीज करून माघारी परतले.

### साताऱ्याने अनुभवला बाबाराजेंच्या वाढदिवसाचा जल्लोष...

**आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा वाढदिवस सातारा शहरात धूमधडाक्यात साजरा झाला. साताऱ्यात रात्री गोलबाग परिसरामध्ये मोठी एलईडी स्क्रीन लावण्यात आली होती. तेथे शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासमवेत हजारो कार्यकर्ते एकत्र जमून त्यांनी शिवेंद्रराजे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी जेसीबीच्या ट्रॉलरमधून हजारो फुलांची उधळण करण्यात आली. शिवेंद्रसिंहराजे समर्थकांच्या वतीने रक्तदान शिबिर, लकी ड्रॉ स्पर्धा, आनंद भवन येथे मिस्टानाचे वाटप, अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर शिवेंद्रसिंहराजे हे सकाळीच शेंद्रे येथील कारखाना कार्यस्थळावर तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन तेथील पदाधिकाऱ्यांना भेटले. स्वर्गीय अभयसिंह उर्फ दादासाहेब महाराज यांच्या शिल्पाकृती पुतळ्याला त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संध्याकाळी सहाच्या नंतर येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर शुभेच्छांचा स्वीकार करत शिवेंद्रसिंहराजे यांनी सातारकरांशी संवाद साधला.**

## अजित पवारांनी केलेल्या सर्व्हेत सुप्रिया सुळे आघाडीवर

### रोहित पवार यांचा दावा

**राजदंड / पुणे**

लोकसभा निवडणुकीला जवळपास दीड महिन्यांचा कालावधी राहिला असून राज्यात अद्यापपर्यंत कोणत्याही पक्षाचे जगावाटप पूर्णपणे झाले नाही. तर प्रत्येक राजकीय पक्षाकडून चर्चाच सुरू आहे. या सर्व घडामोडी दरम्यान राज्यातील सर्व जनतेचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदार संघासाठी महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर महायुतीकडून सुनेत्रा पवार यांच्या नावाची अद्यापपर्यंत घोषणा जरी झाली नसली तरी सुनेत्रा पवार यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. तर बारामती लोकसभा मतदारसंघात येर्णाया हवेली तालुक्यातील भेकराईनगर भागात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत, राज्यातील अनेक घडामोडी बाबत त्यांनी भूमिका देखील मांडली.

राज्यातील अनेक भागातील महायुतीकडून उमेदवार जाहीर करण्यात आले आहे. सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदार संघामधून महायुतीकडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. मात्र अद्यापपर्यंत त्यांच्या नावाची घोषणा केली जात नाही. त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, बारामती लोकसभा मतदार संघासाठी अजित पवार यांच्याकडून जे कोणी उमेदवार असतील. त्यांच्या बाबत अजित पवार यांच्याकडून ९ सर्व्हे करण्यात आले आहेत. त्या सर्व्हेमध्ये अजित पवार यांचे उमेदवार पिछाडीवर आहेत. तर सुप्रिया सुळे या त्यांच्या सर्व्हेमध्ये आघाडीवर आहेत. त्यामुळे आता पुन्हा एकदा म्हणजेच दहावा सर्व्हे करतील आणि योग्य असा निर्णय घेतील, तसेच बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे या किमान अडीच लाख मताधिक्यानी निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करत अजित पवारांना त्यांनी टोला लगावला.

तसेच ते पुढे म्हणाले की, मागील काही महिन्यांत भाजपने देशात आणि राज्यात पक्ष, कुटुंब फोडाफोडीची जी कार्यपद्धती अवलंबली आहे. त्यावर भाजपचे अनेक नेते मंडळी नाराज आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मतदार मोठ्या (पान २ वर)

## बारामतीतून सुनेत्रा अजित पवार यांच्या नावाची घोषणा

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**



बारामती लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार म्हणून सुनेत्रा अजित पवार यांच्या नावाची घोषणा प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

महायुतीच्या माध्यमातून या अगोदरच रायगड मतदारसंघातून सुनिल तटकरे तर शिरुर मतदारसंघातून शिवाजीराव आढळराव पाटील या दोन उमेदवारांची अजितदादा पवार यांनी घोषणा केली होती. आणि आज प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या कोट्यातील परभणी मतदारसंघात रासपचे महादेव जानकर यांची उमेदवारी तर त्यानंतर बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा अजित पवार यांच्या उमेदवारीची घोषणा केली.

# शिरूरमधून अमोल कोल्हे यांना उमेदवारी

### शरद पवार गटाकडून पहिली यादी जाहीर

**राजदंड / मुंबई**

लोकसभा निवडणुकीसाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची पहिली उमेदवार यादी जाहीर करण्यात आली आहे. पहिल्या यादीत बारामतीतून सुप्रिया सुळे, शिरुर लोकसभा मतदारसंघातून अमोल कोल्हे यांना संधी देण्यात आली आहे. तर नुकतेच अजित पवार गटातून शरद पवार गटात आलेल्या निलेश लंके यांना अहमदनगरमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषद उमेदवारांची नावे घोषित केली आहेत.

**शरद पवार गटाची पहिली यादी**

- वर्धा - अमर काळे
- दिंडोरी - भास्करराव भगरे
- बारामती - सुप्रिया सुळे
- शिरुर- डॉ. अमोल कोल्हे
- अहमदनगर- निलेश लंके

नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलेल्या अमर काळे आणि निलेश लंके यांना लोकसभेच्या मैदानात उतरवण्यात आलं आहे. निलेश लंके यांना अहमदनगरमधून तर अमर काळे यांना वर्धा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. भाजपने नगरमधून सुजय विखे यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर शरद पवारांनी त्यांच्याविरोधात निलेश लंके यांना उमेदवारी दिली आहे. विशेष म्हणजे निलेश लंके आमदारकीचा राजीनामा देऊन विखेंविरोधात मैदानात उतरले आहेत.

दिंडोरी लोकसभा निवडणुकीसाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून भास्कर भगरे यांची उमेदवारी आज जाहीर करण्यात आली. केंद्रीय मंत्री डॉ.भारती पवार यांची दिंडोरी लोकसभेसाठी पुनश्च भाजपकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा तिढा सुरू होता. अनेक इच्छुक असल्याने उमेदवार जाहीर केला जात नव्हता आज अखेर (पान २ वर)

# पुरंदरमधील रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी निवडणुकीतून माघार

### विजय शिवतारे यांची सासवड येथील पत्रकार परिषदेत माहिती

**राजदंड / सासवड**

पवारांची झुंडशाही आणि घराणेशाही संपविण्यासाठी लोकसभा निवडणूक लढविणार आहे. तसेच अजित पवार हा विंचू आजपर्यंत अनेकांना डसला, तोच विंचू महादेवाच्या पिंडीवर जावून बसला असून त्याने अनेकांची अडचण निर्माण केली आहे. त्यांची जुलमी राजवट संपविण्यासाठी १२ एप्रिल रोजी १२ वाजता उमेदवारी अर्ज दाखल करून पवारांचे बारा वाजविणार. पवारांची नांगी ठेचणार अशी भीमगर्जना करणारे विजय शिवतारे यांनी आठवड्याच्या आतच अक्षरशः नांगी टाकली आहे. एवढेच नाही तर पुरंदर मधील रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठीच निवडणुकीतून माघार घेतल्याची मखलाशी केली आहे. १५ वर्षे पवारांना कडाडून विरोध करणारे विजय शिवतारे यांनी लोकसभा निवडणुकीत ''सुनेत्रा वहिनी '' यांना पुरंदर मधून ५० हजार मतांचे लीड देणार असल्याचे जाहीर केले आहे.



पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी लोकसभा निवडणुकीत स्वतःची उमेदवारी जाहीर करून संपूर्ण राज्यात एकच राळ उडवून दिली होती. त्यानंतर पुरंदर सह दौंड, बारामती, इंदापूर, भोर आदी तालुक्यात जाहीर सभा घेवून कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवून दोन्ही पवारांना कायमचे घरी बसविणार अशा वल्गना केल्या होत्या. हर्षवर्धन पाटील, अनंतराव थोपटे, आदी नेत्यांना भेटून आणखी वातावरण तापवून दिले होते. '' अजित पवार मला पुरंदरला येवून धमकी देतो '' तुला आता माझी ताकद दाखवितो, तू पण कसा निवडून येतो तेच मी पहातो '' पवारांनी राजकीय दहशदवाद पोसला असून मी तो या निवडणुकीत संपविणार असे जोरदार टीकास्त्र सुरु केल्याने संपूर्ण देशाचे बारामती लोकसभा मतदार संघाचे लक्ष लागले होते.

परंतु या घोषणा देवून काही दिवस होतात तोच विजय शिवतारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासोबत भर मध्यरात्री मुंबई मध्ये बैठक घेवून विरोधाची धार कमी केली. तसेच त्यांच्या भेटीचा एकत्रित फोटोही व्हायरल केला. यानंतर त्यांनी दोन दिवसांनी सासवड मध्ये बैठक घेवून माहिती देणार असल्याचे सांगितले होते.त्यानुसार आज शनिवार दि. ३० रोजी शिवतारे यांनी सासवड मध्ये पक्ष कार्यकर्त्यांसोबत बैठक घेवून आपले म्हणणे स्पष्ट केले त्यानंतर प्रसार माध्यमाशी बोलताना पुरंदरचे रखडलेले प्रकल्प मार्गी लागण्यासाठी लोकसभा निवडणुक मधून माघार घेत असल्याचे स्पष्ट केले.

याबाबत अधिक माहिती देताना शिवतारे म्हणाले मी अपक्ष सुद्धा निवडून आलो असतो, परंतु खासदार झाल्यावर मला पक्षच नसल्याने मतदार संघाचे नुकसान होवू नये यासाठी मी निर्णय घेतला आहे. २७ रोजी मला (पान २ वर)

पान १ वरून

## पुरंदरमधील रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी निवडणुकीतून माघार

महत्वाचा फोन आला आणि महविकास आघाडीचे नुकसान होईल असे सांगितले. महायुतीत अडचण येवू नये आणि आपले नुकसान होवू नये तसेच नरेंद्र मोदी यांना देशाचे पुन्हा पंतप्रधान करताना कोणतीही चूक माझ्याकडून होवू नये यासाठी थांबण्याचा निर्णय घेतला आहे असे सांगितले.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच विजय शिवतारे यांच्या बैठकीत खालील मुद्यांवर चर्चा झाली -**

भोर मधील तीन पाणी योजना पूर्ण करायच्या आहेत. आचारसंहिता संपल्या बरोबर गुंजवणी बरोबरच इतर तीन योजना लगेच मंजुरी घेवून कामे सुरू करण्यात येतील. दोन वर्षांच्या आत गुंजवणी योजनेचे काम पूर्ण होवून पाणी पुरंदरला येईल तसेच पुरंदर विमानतळ प्रकल्प बाबत भूसंपादन न करता स्वेच्छेने जमिनी घ्यायच्या, लोकांची इच्छा असेल तरच चालू दराने जमीन खरेदी करायची यासाठी शासनाने शासनाने पैशांची व्यवस्था करावी. दिवे येथे शासकीय २०० एकर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय बाजार प्रकल्प मंजूर केला होता. मात्र सरकार गेल्यावर तो बंद पडला होता. तो पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

फुरसुंगी मधील नागरिकांना जास्त कर भरावा लागत होता. याबाबत निवडणुकीनंतर दुसरे नोटिफिकेशन काढण्यात यावे असे सांगितले आहे. फुरसुंगी देवाची उरुळी पाण्याची योजना मंजूर झाली होती. परंतु सध्या ती बंद होती सध्या २५ कोटी रुपये मधून पानी आले मात्र काही वस्त्या अद्यापही वंचित आहे. यासाठी याचा समावेश या योजनेत करून अतिरिक्त निधी देण्याची मागणी केली आहे. त्यास मान्यता मिळाली आहे. पुण्यात असलेले गोडवून वडकी येथे १७ एकर गायरान मध्ये बांधावीत तसेच कोडित सारख्या शासकीय जमिनीत मोठे प्रकल्प बांधावीत अशा सूचना मांडल्या आहेत. त्यातून तालुक्यातील लोकांना रोजगार मिळेल असे शिवतारे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी ज्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे आणि निवडणुकीच्या निकालानंतर लगेच कामे सुरु करणार आहेत त्यांची घोषणा ते स्वतः याच पालखी तळावर येवून करणार आहेत. तसेच आमच्यातील कटुता संपली असून यापुढे महायुती सोबत राहून काम करायचे आहे असे विजय शिवतारे यांनी सांगितले आहे.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा धनगरी घोंगडी देवून सत्कार

कार्यकर्त्यांचे पालकत्व माझ्याकडे आहे .तुम्ही निश्चिंत रहा.यानंतर फडणवीस यांनी निवडणूकी साठी महत्त्वपूर्ण असलेल्या पुणे जिल्हा दक्षिण च्या संघटनात्मक कामाचा आढावा सरचिटणीस आकाश कांबळे व ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष गजानन वाकसे यांच्याकडून घेतला.

यावेळी रमेश चांदगुडे यांच्यासह तालुक्यातील प्रमुख नेते बैठकीस आमंत्रित होते.

## 'पॉर्न व्हिडीओ' तयार करणारी टोळी गजाआड

ऑनलाईन प्रसारित करीत आहेत.

त्या बातमीच्या आधारे पोलिसांचे एक पथक तयार करून तात्काळ माहिति मिळालेल्या ठिकाणी छापा टाकण्यात आला. या छाप्यात पोलिसांना सदरच्या बंगल्यात संभोगाच्या बीभत्स चित्रफीत तयार करीत असलेली मंडळी रंगेहाथ मिळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून ५ महिला आणि १० पुरुषांसह हा बंगला बेकायदेशीरपणे भाड्याने देणाऱ्या आणि तो चालवणारे ३ जण अशा एकूण १८ जणांना ताब्यात घेऊन चित्रफीत तयार करण्यासाठी वापरलेले दोन कॅमेरे, वेगवेगळ्या लाईट, वायरलेस माईक, लॅपटॉप आदी मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी सदर आरोपींवर गुन्हा भादवि कलम २९२,२९३,३४., माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००८ कायदा कलम ६७,६७ (अ), स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपन अधिनियम १९८६ कायदा कलम ३,४,६,७ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पुणे ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, लोणावळाउपविभागाचे सहा. पोलीस अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांचे मार्गदर्शनाखाली आणि पो. नि. किशोर धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली पो.उप.नि. भारत भोसले, सागर अरगडे, सहा.पो.उप.नि. अजय दरेकर, महेंद्र वाळुंजकर, युवराज बनसोडे, पो. हवा. बाळकृष्ण भोईर, दुर्गा जाधव, महिला पो.हवा. पुष्पा घुगे, महीला पो. ना. रुपाली पोहीनकर, पो. कॉ. सागर धनवे, सूरज गायकवाड यांनी केली.

## शिरूरमधून अमोल कोल्हे यांना उमेदवारी

दिंडोरी लोकसभेसाठी महाविकास आघाडीचा उमेदवार भास्कर भगरे यांची उमेदवारी राष्ट्रवादीकडून जाहीर करण्यात आली.

जयंत पाटील यांनी आज राष्ट्रवादीच्या ५ उमेदवारांची घोषणा केली आहे. यामध्ये विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांना बारामती लोकसभा मतदारसंघातून चौथ्यांदा उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सुप्रिया सुळे यांची सुनेत्रा पवार यांच्या लढत होणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. तर अमोल कोल्हे यांना शिरुरमधून दुसऱ्यांदा उमेदवारी देण्यात आली आहे. शिवाजी आढळराव पाटील यांची पुन्हा एकदा अमोल कोल्हे यांच्याशी लढत होणार आहे. २०१९ च्या निवडणुकीत अमोल कोल्हे यांनी आढळराव पाटील यांचा पराभव केला होता.

## अजित पवारांनी केलेल्या सर्व्हेत सुप्रिया सुळे आघाडीवर

प्रमाणावर नाराज आहे. यामुळे एकूणच परिस्थिती बघता,भाजपला त्यांचाच भाजपचा मतदार मतदान करणार नसल्याचे हे दिसून येत असल्याचे सांगत भाजप नेतृत्त्वावर त्यांनी निशाणा साधला.

अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी राजीनामा देऊन शरद पवार गटा सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, आमदार निलेश हे अजित पवार यांच्याकडे होते. त्यावेळी सातत्याने निलेश लंके यांना मतदार संघातील नागरिक भेटून सांगत होते की, जर तुम्ही साहेबांसोबत असला तर आम्ही तुम्हाला मतदान करू, त्यानंतर त्यांनी लोकसभा निवडणुक लढविण्याची इच्छा बोलावून दाखवली आणि आता निलेश लंके हे साहेबासोबत आल्याने त्यांचे मताधिक्य चांगलेच असणार आहे. बलाढ्य शक्ती विरोधात सामान्यांची शक्ती अशी लढत होणार आहे. त्यामध्ये सर्व सामान्य नागरिक निलेश लंके यांच्या पाठीशी राहतील आणि त्यांना खासदार करतील असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

'काशीनाथाच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषात

# बावधनच्या भैरवनाथाची 'बगाड' यात्रा उत्साहात



**राजदंड / वाई**

बावधनचे ग्रामदैवत भैरवनाथाच्या बगाडाची मिरवणूक 'काशीनाथाचं चांगभलं'च्या जयघोषात आज हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात व शांततेत पार पडली. बावधन गावाच्या पूर्वेस कृष्णातीरावरील सोनेश्वर येथून सकाळी १० वाजण्याच्या सुमारास बगाड मिरवणुकीस प्रारंभ झाला. त्यापूर्वी बगाडयाकडून देवदेवतांची विधीवत पूजा-आरती करण्यात आली. त्यानंतर बगाडयास पारंपारिक पोशाख घालून बगाडाच्या झोपाळयावर चढविण्यात आले. यावेळी भाविकांनी नोटांची व नारळाची तोरणे, झेंडे, नवसाचे गोंडे बगाडाच्या शिडाला बांधले.

बगाडाच्या रथावर सुमारे तीस-चाळीस फुटाच्या उंचीच्या शिडावर झोपाळ्याच्या साहय्याने बगाड्यास चढविण्यात येते. एका वेळी बारा बैल जोडयांच्या साहाय्याने हा रथ ओढण्यात येत होता. ठराविक अंतरावर बैल बदलण्यात येत होते. त्यासाठी पंधराशे बैल शिवारातून उभे दिसत होते. बगाड रथाच्या मागे वाघजाईदेवी, भैरवनाथ, आणि ज्योतिवाची पालखी सुशोभित करून ठेवण्यात आली होती. त्याचे भाविक दर्शन घेत होते.

यावर्षी शेलारवाडी येथील विकास तानाजी नवले हे बागाड्याचे मानकरी होते. ठीक ठिकाणी बगाड थांबवून विश्रांती घेण्यात येत होती. यावेळी पाच फेऱ्या घालण्यात येत होत्या. 'काशीनाथाच्या नावानं चांगभलं'च्या निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमला होता. खासदार उदयनराजे भोसले यांनी भेट देऊन बगाडाचे दर्शन घेतले. यात्रा नियोजन समितीचे सदस्य बगाडाच्या पुढे व मागे ध्वनीक्षेपकावरून मार्गदर्शन व सूचना करीत होते. भाविकांच्या सोयीसाठी विविध व्यक्ती व सामाजिक संस्थांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. दुपारी साडेचार वाजता बगाड, वाई- सातारा रस्त्यावर आले. यावेळी काही काळ वाहतूक बंद करण्यात आली.

सायंकाळी ६ वाजता बगाड गावात मंदिराजवळ पोहचले. यावेळी वाद्यांचा गजर करण्यात आला. बगाड मिरवणूक पाहण्यास व सहभागी होण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते यात्रेसाठी पोलीस उपअधिक्षक बाळासाहेब भालचीम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे, उपनिरीक्षक सुधीर वाळुंज, बिपिन चव्हाण विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांचा मोठा बंदोबस्त तैनात होता. बगाड मिरवणूक शांततेत पार पडली.

# लातूरमध्ये मोठा राजकीय भूकंप; अर्चना पाटील चाकूरकर यांचा भाजपात प्रवेश

**राजदंड / लातूर**

काँग्रेसला राज्यात आणखी एक मोठा धक्का बसला असून, माजी केंद्रीय गृहमंत्री तथा काँग्रेसचे नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सूनबाई अर्चना पाटील चाकूरकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. अशोक चव्हाण, बसवराज पाटील यांच्यापाठोपाठ अर्चना पाटील चाकूरकर यांचा हा मोठा पक्षप्रवेश समाजाला जात आहेत. या प्रवेशामुळे मराठवाड्यातून भाजपात प्रवेश करणाऱ्या नेत्यांची संख्या आणखी वाढणार आहे. तर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये हा पक्ष प्रवेश होत आहे.

पेशाने डॉक्टर असलेल्या अर्चना पाटील चाकूरकर यांनी आज भाजपात प्रवेश केला आहे. काही दिवसांपूर्वी अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर मराठवाड्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता असल्याचे पाहायला मिळत होते. चव्हाण यांच्या प्रवेशानंतर लगेचच शिवराज पाटील चाकूरकर यांचे मानसपुत्र माजी राज्यमंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांनीही भाजपात जाने पसंद केले. त्यामुळे येत्या काळात मराठवाड्यात काँग्रेसमध्ये फक्त देशमुख गटाचे वर्चस्व पाहायला मिळण्याची शक्यता आहे. याच बाबींच विचार करता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सुनबाई अर्चना पाटील चाकूरकर यांना भाजपने पक्षात घेतले आहेत. विशेष म्हणजे अर्चना पाटील चाकूरकर या अमित देशमुखांविरोधात विधानसभा निवडणूक लढवणार असल्याची देखील चर्चा आहे.



**लातूर काँग्रेसला मोठा धक्का!**

मागील अनेक वर्षापासून देशमुख कुटुंबाचं लातूरच्या राजकारणात वर्चस्व पाहायला मिळते. मराठवाड्यात अशोक चव्हाण कुटुंब आणि देशमुख कुटुंब या दोन्ही कुटुंबाचे काँग्रेस पक्षात देखील मोठा दबदबा असल्याचे चित्र पाहायला मिळायचे. अशात काही दिवसांपूर्वी अशोक चव्हाण भाजपमध्ये दाखल झाले. त्यामुळे आता देशमुख कुटुंबाचे मराठवाड्यातील राजकीय वर्चस्व पाहता अर्चना पाटील चाकूरकर यांचा पक्षप्रवेश महत्वाचा समजला जात आहे. तसेच, आगामी विधानसभा निवडणुकीत अमित देशमुखांविरोधात अर्चना पाटील चाकूरकर विधानसभा निवडणूक लढवणार असल्याची देखील चर्चा आहे.

**फडणवीसांनी दिलेली जबाबदारी १०० टक्के पार पाडणार...**

भाजपमध्ये पक्षप्रवेश करतांना अर्चना पाटील चाकूरकर म्हणाल्या की, ''मी गेली २० वर्ष सामाजिक क्षेत्रात काम करते. माझा हा राजकीय प्रवासाचा निर्णय आहे. मी आज हा श्री गणेशा आजपासून करत आहे. मोदी साहेबांचा प्रवास आम्ही बारकाईन बघत होतो. संसदेतले पहिले महिला विधेयक पारीत झालं, तो एक ऐतिहासिक निर्णय होता. आरक्षणामुळे महिलांना संधी मिळेल. देवेंद्र भाऊ तुम्ही जी जबाबदारी द्याल ती १०० टक्के पार पाडीन, असे अर्चना पाटील चाकूरकर म्हणाल्या.

# वांद्रे-वरळी सी-लिंकवर टोलवाढ

### सातारा, पुणेसह मुंबईकरांच्याही खिशाला फटका!

**राजदंड / मुंबई**

पुणे-सातारा आणि पुणे-नाशिक प्रवास महागणार असून १ एप्रिलपासून टोल दरात वाढ होणार आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांच्या खिशाला कात्री बसणार आहे. पण यासोबतच आता मुंबईकरांच्याही खिशाला भार सोसावा लागणार आहे. याचं कारण म्हणजे वांद्रे-वरळी सी लिंक (इरपवीर थीश्रळ डशर डळपज्ञ) म्हणजेच राजीव गांधी समुद्र सेतूवरुन प्रवास करणाऱ्यांसाठी १ एप्रिलपासून टोलमध्ये वाढ (ऊदत्त प्ज्ञा) करण्यात आली आहे. ही टोल वाढ १८ टक्के एवढी करण्यात आली आहे.

वांद्रे-वरळी सी लिंकवरुन प्रवास करणं आता महाग होणार आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरांनाशहराच्यादक्षिणेकडील भागातील जोडण्यासाठी हा सेतू महत्त्वाचा आहे. या टोल वाढीमुळे सध्याच्या कार आणि जीपचे टोल ८५ रुपयावरून १०० रुपयावर जाणार आहेत. तसेच मिनीबस, टॅम्पो आणि इतर वाहनांमधील प्रवाशांना १३० रुपयावरुन १६० रुपये आकारले जाणार आहेत. तर एकेरी प्रवासासाठी १७५ रुपये ऐवजी दोन एक्सेल ट्रकसाठी २१० रुपये आकारले जाणार आहेत.

**१ एप्रिल २०२४ पासून तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना**

दरम्यान, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने टोलमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. याची तात्काळ अंमलबजावणी १ एप्रिल २०२४ पासून होणार असल्याची माहिती देखील मंडळाने दिली आहे. माहीम दादर प्रभादेवी वरळी भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पश्चिम उपनगरातील वाहनधारक या सागरी सेतूचा उपयोग करत असतात. तर याच सागरी सेतुला आता धर्मवीर छत्रपती संभाजी राजे सागरी किनारा मार्ग सुद्धा जोडण्यात येत आहे. हा सागरी किनारा रस्ता सिलिंगला जोडल्यास यावरुन वाहनांची संख्या आणखी वाढणार आहे.

# नवाब मलिक यांची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल

**राजदंड / मुंबई**

माजी मंत्री नवाब मलिक यांची प्रकृती अचानकपणे बिघडली आहे. प्रकृती बिघडल्याने त्यांना कुर्ला येथील क्रिटिकेअर सेंटर रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आलं आहे. नवाब मलिक नेमकं कोणत्या त्रासामुळे रुग्णालयात दाखल झाले आहेत, हे अद्याप समजू शकलेले नाही. मात्र सध्या त्यांच्यावर उपचार चालू आहेत.

**नवाब मलिक यांच्यावर उपचार**

नवाब मलिक हे राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे नेते आहेत. महाविकास आघाडी सरकारमध्ये ते मंत्री राहिलेले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंड केल्यानंतर त्यांनी अजित पवार यांना समर्थन देण्याचा निर्णय घेतला. काही महिन्यांपूर्वी ते तुरुंगातून बाहेर आहेत. तेव्हापासून ते सार्वजनिक कार्यक्रमात फारसे दिसलेले नाहीत. त्यानंतर आता त्यांची प्रकृती ठिक नसल्याचे समोर आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार चालू आहेत.

**प्रकृतीचे कारण देत मागितला होता जामीन**

नवाब मलिक यांना ईडीने २०२२ मध्ये गोवावाला कंपाऊंड प्रकरणात मनी लाँड्रिंग कायद्याखाली अटक केली होती. तेव्हापासून ते तुरुंगात होते. नंतर ऑगस्ट २०२३ मध्ये ते अटीशर्तीसह जामिनावर तुरुंगातून बाहेर आले होते. प्रकृतीचे कारण देत जामीन मिळावा अशी मागणी तेव्हा त्यांनी केली होती.

**अगोदर तटस्थ भूमिका, पण नंतर...**

नवाब मलिक तुरुंगातून बाहेर आले तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस दोन गटांत विभागलेली होती. त्यामुळे ते कोणत्या गटात सामील होणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. सुरुवातीला त्यांनी तटस्थ भूमिक घेतली होती. नंतर मात्र त्यांनी अजित पवार गटाला साथ देण्याचा निर्णय घेतला. सध्या ते अजित पवार गटात आहेत.

# राज्य शासनाकडून मतदानादिवशी भर पगारी सुट्टी देण्याचे आदेश

**राजदंड / पुणे**

राज्यातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघांसाठी पाच टप्प्यात मतदान होणार आहे. १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि ५ मे या दिवशी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. नोकरी, व्यवसाय, रोजगारानिमित्त अनेकांनी स्थलांतर केले असले, तरी त्यांचे मतदान मूळगावी, दुसऱ्या मतदारसंघात असते. त्यामुळे अनेक मतदारांना कामावरून सुटी दिली जात नाही. याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे राज्य शासनाने सर्व आस्थापनांना खासगी, शासकीय संस्था, महामंडळे, उद्योग, व्यावसायिक आणि महामंडळाच्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी देण्याचे जाहीर केले आहे.

राज्य शासनाच्या उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाचे कार्यासन अधिकारी शामकांत सोनावणे यांनी हे आदेश काढले आहेत.

अत्यावश्यक सेवा म्हणजेच रुग्णालये, वैद्यकीय संस्था आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांना सुटी देणे शक्य नाही. या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी घ्यावी. परवानगी देताना स्थानिक मतदारसंघातच ज्यांचे मतदान आहेत त्या मतदारांना मतदानासाठी दोन तासांची सवलत दिली जाईल, याची खात्री करून कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद केले आहे.

# उष्णता वाढली! राज्य सरकारकडून उष्माघातापासून संरक्षणासाठी सूचना जारी

**राजदंड / मुंबई**

दिवसेंदिवस राज्यातील तापमानात मोठी वाढ होताना दिसत आहे. सकाळच्या वेळेतही प्रखर ऊन जाणवत आहे. वाढत्या ऊनामुळे घराच्या बाहेर पडणं देखील मुश्किल झालं आहे. नागरिकांना वाढत्या उष्णतेचा त्रास होत असून उष्माघाताच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे उष्माघातापासून संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

राज्यात यावर्षी उष्माघाताच्या १३ रुग्णांची नोंद झाली आहे. बीडमध्ये सर्वाधिक चार रुग्ण तर रायगडात दोन रुग्णांची नोंद झाली आहे. अहमदनगर, अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, धुळे आणि साताऱ्यात प्रत्येकी एका रुग्णाची नोंद झाल्याची माहिती राज्य सरकारच्या वतीने देण्यात आली आहे. या वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**उष्माघातापासून संरक्षणासाठी राज्य सरकारच्या सूचना :**

१) तुम्हाला तहान लागली नसली तरीही दिवसभर भरपूर प्रमाणात पाणी प्या.

२) दिवसाच्या सर्वात जास्त उष्णता असलेल्या वेळेत (सामान्यतः सकाळी उशिरा ते संध्याकाळ) म्हणजे सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत घरात किंवा सावलीच्या ठिकाणी राहा.

३) कापसासारख्या कपड्यांपासून बनवलेले हलके, सैल कपडे घाला. गडद रंगाचे कपडे परिधान करणे टाळा.

४) घराबाहेरील, विशेषतः दिवसाच्या सर्वात उष्ण वेळेत (सामान्यतः सकाळी उशिरा ते संध्याकाळ) कामे कमी करण्याचा प्रयत्न करा.

५) तुमच्या चेहऱ्याचे आणि डोळ्यांचे सूर्यापासून संरक्षण करण्यासाठी रुंद टोपी आणि सनग्लासेस घाला.

६) कुटुंबातील मुले, वृद्ध सदस्यांवर लक्ष ठेवा, कारण त्यांना उष्णतेशी संबंधित आजार होण्याची शक्यता असते.

७) अती घाम येणे, अशक्तपणा येणे, चक्कर येणे, मळमळ होणे ही लक्षणे तुम्हाला किंवा इतर कोणाला आढळल्यास ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या. नाहीतर तुम्हाला जास्त त्रास होऊ शकतो.

**काय काळजी घ्यावी?**

तुमच्याकडे वातानुकूलन (एयर कंडिशनर) नसेल, तर हवा खेळती राहण्यासाठी पंखे वापरा आणि तुमची राहण्याची जागा थंड करा. स्थानिक हवामान अंदाज आणि अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या तापमानासंबंधीच्या सूचनांकडे लक्ष द्या. दिवसाच्या सर्वाधिक तापमान असलेल्या वेळेत सामाजिक मेळावे घेणे टाळा.

# दादर रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देणार; नागपूर पोलिसांना 'कॉल'

**राजदंड / मुंबई**

मुंबईतील वर्दळीचं स्थानक म्हणून दादर स्थानकाची ओळख आहे. दादर रेल्वे स्थानकावरुन दिवसागणिक लाखो प्रवासी प्रवास करत असतात. तेच दादर रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देणारा धमकीचा फोनकॉल नागपूर पोलिसांना आला होता. नागपूर पोलिसांनी तातडीने ही माहिती मुंबई पोलीस आणि रेल्वे पोलिसांना दिली. परंतु तो फोनकॉल फेक असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीला अटक देखील केली आहे.

मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेम ार्गाला जोडलेले दादर रेल्वे स्थानक बॉम्बनं उडवून देण्याची धमकी ११२ या हेल्पलाईन नंबरवरून देण्यात आली होती. प्रवाशांची अधिक रेलचेल असणाऱ्या या स्थानकावर धमकीचा कॉल येताच खळबळ उडाली. धमकीचा कॉल येताच पोलिसांनी सतर्कतेने बीडीडीएस पथकासह दादर रेल्वे स्थानकावर कसून तपासणी केली. मात्र कोणत्याही कानाकोपऱ्यात संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. दरम्यान, हा धमकीचा कॉल करणाऱ्या व्यक्तीचाही पोलिसांनी शोध घेतला आहे. विकास शुक्ला असे फेक कॉल करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. आरोपीने फेककॉल केल्याचे कारण अद्यापही स्पष्ट केले नाही. परंतु फेककॉल तसेच कोणतीच संशयास्पद वस्तू आढळली नसल्यामुळे प्रवाशांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

मायानगरी मुंबईत मागील काही वर्षांपासून अशा प्रकारच्या धमकीचे फोन सतत येत आहेत. जून २०२३ मध्येही दादर रेल्वे स्थानकात बॉम्ब ठेवल्याची धमकी देणारा कॉल होता. त्याप्रकरणी पुण्यातील लोणी काळभोर पोलिसांनी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तसेच त्यावेळीही मुंबई लोहमार्ग पोलिसांनी दादर रेल्वे स्थानकाची कसून तपासणी केली होती. मात्र तपासणीत बॉम्बसदृश वस्तू आढळून आली नव्हती.

# कराडात कत्तलखान्यावर पोलिसांचा छापा; ५० पेक्षा अधिक गायींची सुटका



**राजदंड / कराड**

कराड शहरातील मंडईत चालविल्या जाणाऱ्या अवैध कत्तलखान्यावर पोलिसांनी छापा टाकून ५० पेक्षा जास्त गायींची सुटका केली. यावेळी काहींची कत्तल करण्यात आल्याचेही समोर आले. पोलिसांनी तब्बल ५०० किलोचे मांसही जप्त केले आहे. त्याचे नमुने तपासणीला पाठवले आहेत. या कारवाईसाठी साताऱ्यातून पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला होता.

साताऱ्यातील विशेष पथकासह, कराड पोलीस उपाधीक्षक कार्यालय, शहर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने शुक्रवारी पहाटे पाचपासून कारवाई केली. शहरातील भाजी मंडईत बेकायदेशीर कत्तलखाना चालविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथकाकडून गत काही दिवसांपासून खातरजमा केली जात होती.

कत्तलखान्यात गोवंशीय जनावरे आणली जाणार असल्याचे समजल्यानंतर गुरुवारी रात्रीपासून पोलिसांनी त्याठिकाणी वॉच ठेवला होता. शुक्रवारी पहाटे पोलीस बंदोबस्तासह त्याठिकाणी छापा टाकण्यात आला. त्यावेळी ५० पेक्षा जास्त गायी त्याठिकाणी आढळून आल्या. पोलिसांनी छापा टाकला त्यावेळी काही जनावरांची कत्तल करण्यात आल्याचेही दिसून आले.

पोलिसांनी कत्तलखान्यातील गायी ताब्यात घेतल्या. याप्रकरणी काही जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. कारवाईवेळी मंडई परिसरासह शहरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंदोबस्तासाठी साताऱ्याहून पोलीस कुमक मागविण्यात आली होती. याबाबतचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया कऱ्हाड शहर पोलीस ठाण्यात सुरू आहे.

# मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या ‘मॅरेथॉन बैठका’

## ▪ दोन दिवस भाजपा पुणे शहरच्या सर्व आघाड्यांच्या सविस्तर बैठका घेऊन आढावा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली आहेत. दोन दिवस पक्षाच्या सर्व आघाड्यांच्या बैठका घेऊन मताधिक्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराला वेग मिळाला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून महायुतीने मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे निवडणुकीत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली आहेत. शुक्रवारी महिला मोर्चा, ओबीसी मोर्चा, व्यापारी आघाडी, मंडल अध्यक्ष, विस्तारक सोशल मीडिया आणि आयटी सेल यांची बैठक घेतली. शनिवारी अनुसूचित जाती मोर्चा, झोपडपट्टी आघाडी, वैद्यकीय आघाडी, पर्यावरण आघाडी, उत्तर व दक्षिण भारतीय आघाडी, अल्पसंख्याक आघाडी, सहकार, पायाभूत सुविधा, शिक्षक भटके विमुक्त आघाडी यांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन निवडणूक तयारीचा आढावा घेतला. तसेच, पदाधिकाऱ्यांच्या सूचना देखील जाणून घेतल्या.

नामदार चंद्रकांत पाटील म्हणाले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांनी गेल्या दहा वर्षांत सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या आहेत. तसेच, वर्षानुवर्षे प्रलंबित अनेक विषय मार्गी लावले आहेत. आपल्या मानबिंदूंची पुनर्स्थापना केली आहे. त्यामुळे त्यांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावे. राज्य सरकारने ही अनेक जटिल विषय मार्गी लावले आहेत. आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना उच्च शिक्षण घेणे सोपे व्हावे यासाठी; आठ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना शिक्षण मोफत केले. आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन निधी उपलब्ध करून दिला. नुकतेच त्याचे भूमिपूजन देखील झाले.

ते पुढे म्हणाले की, कोविड काळात मुरलीधर मोहोळ यांनी महापौर नात्याने पुणे शहराला केले काम फारच परिणामकारक होते. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे पुणे शहराने कोविडवर यशस्वी मात केली. पुणेकरांना याची जाणीव आहे. त्यामुळे मोदीजींना पुन्हा पंतप्रधान होण्यासाठी आणि मुरलीधर मोहोळ यांना खासदार बनविण्यासाठी पुणेकर मतदान करणारच आहेत. पण तरीही कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचून मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना दिल्या.

शहराध्यक्ष धीरज घाटे म्हणाले की, देशातील सर्वसामान्यांचा माननीय मोदीजींवर दृढ विश्वास आहे. मोदीजींनी सर्वसामान्यांचा नेहमीच विचार केला. माननीय मोदीजींच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांच्या काळात देशात केलेले काम, विकास कामे सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यात यावे, असे आवाहन केले.

या बैठकीला शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, पुणे लोकसभा निवडणूक प्रभारी श्रीनाथ भिमाले, सरचिटणीस पुनीत जोशी, राघवेंद्र बापू मानकर, रवी साळेगावकर यांच्या सह भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी सर्वच आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी मुरलीधर मोहोळ विक्रमी मतांनी विजयी होतील, असा संकल्प व्यक्त केला.




### ‘सीएए’ निर्वासितांना नागरिकत्व देणारा कायदा - ना. पाटील

**देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने आणलेला नागरिकता सुधारणा कायदा हा पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान आदी देशातील त्रासाला कंटाळून भारतात आलेल्या निर्वासित सहा धर्मियांना नागरिकत्व देणारा कायदा आहे. कोणाचंही नागरिकांचं नागरिकत्व काढून घेतलं जाणार नाही. त्यामुळे सीएएबद्दल जनजागृती करावी, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.**


### विरोधकांच्या राज्यघटना बदलाच्या अपप्रचाराला खोडून काढा

**विरोधकांकडे मुद्दे नसल्याने, ते राज्यघटना बदलाचा अपप्रचार करत आहेत. उलट काँग्रेसने स्वतः च्या स्वार्थासाठी ४० वेळा घटना बदल केला. इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करुन हुकूमशाही आणली. त्यामुळे हे सर्व जनतेसमोर मांडून विरोधकांचे मुद्दे वेळीच खोडून काढा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.**

# धंगेकर, मोहोळ यांची प्रचारात आघाडी, वसंत मोरे कोणत्या पक्षातर्फे लढणार?







**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

पुणे लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि माहायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. तर, मनसेचे माजी गटनेते वसंतराव मोरे यांनी अद्यापही कोणत्या पाक्षातून निवडणूक लढणार, हे जाहीर केले नाही. मात्र, १०० टक्के निवडणूक लढणार, एकतर्फी निवडणूक होणार नासल्याचा दावा मोरे यांनी केला आहे.

यंदाच्या पुणे लोकसभा निवडणुकीत पुणे महापालिकेच्या ३ नगरसेवकांमध्ये लढत होणार आहे. हे तिन्ही नगरसेवक सभागृहात पुणेकरांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले. त्यामुळेच राजकीय पक्षांनी त्यांना उमेदवारी दिली आहे. वसंतराव मोरे यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन आपली दिशा स्पष्ट केली आहे. मराठा समाजाच्या बांधवांशीही त्यांनी भेट घेतली आहे. त्यामुळे मोहोळ, धंगेकर आणि मोरे अशी तिरंगी लढत पुण्यात होणार आहे. मोहोळ आणि धंगेकर यांच्या उमेदवारीला स्व पाक्षातूनच विरोध होत आहे. मात्र, हा विरोध लवकरच थांबणार असल्याची कुजबुज सुरू आहे.

शरद पवार यांनी धंगेकर यांच्याशी झालेल्या चर्चेत माजी गटनेते आबा बागुल लवकरच तुमच्या प्रचाराला लागणार असल्याचे सांगितले. तर, दुसरीकडे राज्यसभेचे खासदार संजयनाना काकडे यांचीही नाराजी लवकरच दूर करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर ही निवडणूक होत आहे.

# मतदार यादीत कोणताही दोष नाही; तांत्रिक त्रुटींची तात्काळ दुरूस्ती

## जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचे स्पष्टीकरण

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा निवडणूक प्रशासनाने मतदार यादी शुद्धीकरणासाठी विशेष प्रयत्न केले असल्याने मतदार यादीत कोणतेही दोष नसून काही ठिकाणी आढळलेल्या तांत्रिक त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे स्पष्टीकरण जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहे. नागरिकांनी मतदार यादीबाबत काही शंका असल्यास नागरिकात संभ्रम होईल, अशी माहिती इतरत्र न देता प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

भोर विधानसभा मतदारसंघातील काही नावे गुजरातीत असल्याबाबत आलेल्या तक्रारीनंतर काही माध्यमांनी ‘मतदार यादीत घोळ’, ‘मतदार यादीत अनेक नावे बोगस लावली’ अशा आशयाचे वृत्त दिले आहे. म्हाळुंगे येथील संतोष मोहोळ यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे हे वृत्त देण्यात आले आहे. श्री.मोहोळ यांनी आपल्या तक्रारीत म्हाळुंगे येथील मतदार यादी क्रमांक १०४ ते १०९ मधील अनेक मतदारांची नावे गुजराती भाषेत आहेत. तसेच एका मतदाराचे नाव म्हणुन मंदिराचे नाव यादीत आहे. याबाबत बोगस मतदार असण्याची शक्यता व्यक्त करून चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली होती.



प्रशासनाने त्याच दिवशी अर्थात २७ मार्च रोजी पत्राची तात्काळ दखल घेवून श्री.मोहोळ यांना प्रशासनाने यापूर्वीच केलेल्या कार्यवाहीविषयी पत्राद्वारे माहिती दिली होती.

निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये एका ठिकाणी मतदार यादीत असलेल्या व्यक्तीला दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होण्यासाठी नमुना अर्ज क्र. ८ (स्थलांतर/पत्त्यात बदल) भरता येतो. राज्यातील विविध भागातून तसेच वेगवेगळ्या राज्यातून मुळशी तालुक्यातील हिंजवडी, सूस, म्हाळुंगे, बावधन बु., माण, मारूंजी या भागात रोजगार, नोकरी व्यवसाय निमित्त स्थलांतर होत असल्याने तेथील नागरीक या भागात रहिवासास आल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने नमुना अर्ज क्र. ८ (स्थलांतर/पत्त्यात बदल) भरत असतात.

प्रस्तुत प्रकरणात ३ मतदार हे सद्यस्थितीत सदर यादी भागाचे सर्वसाधारण रहिवाशी असून ते या यादी भागात रहिवासास येण्यापुर्वी गुजरात राज्यात रहिवासासाठी होते. त्यांनी मतदार यादीच्या संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने नमुना अर्ज क्र. ८ सादर केल्यांनतर त्यासोबत जोडलेले रहिवासाचे कागदपत्रे तपासून सदर अर्ज स्विकृत करण्यात आला. त्यानंतर मतदाराचा पूर्वीच्या मतदार यादीतील ठिकाणचा इंग्रजी भाषेतील तसेच तेथील स्थानिक भाषेतील नावाचा तपशील इकडील कार्यलयास प्राप्त होतो. त्यामुळे सदर मतदार हे या यादी भागात समाविष्ठ झाल्यानंतर संगणकीय प्रणालीवरील सुविधेच्या आधारे त्यांची नावे स्थानिक भाषेत रूपांतरीत करण्यात येत असतात. आतापर्यंत बाहेरच्या राज्यातून अशा प्रकारे स्थलांतरित झालेल्या मतदारांच्या नावाचे स्थानिक भाषेत रूपांतरण करण्यात आले आहे. ही प्रक्रिया ही निरंतर स्वरूपाची आहे.

वृत्तात यादी भागात एका महिला मतदाराच्या नावाबाबत उल्लेख करण्यात आला आहे. हे नाव यादी भागात पुर्वीपासून होते. ही महिला मतदाराच्या नावाच्या तपशीलामध्ये नावाऐवजी सर्वसाधारण रहिवास पत्त्याच्या जवळचा परिसर म्हणून तेथील स्थानिक मंदिराचे नाव अर्जदार यांचेकडून अर्जात भरले गेल्याने ते नाव मुद्रीत झाले होते. त्यानंतर मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडून मतदारांच्या स्थानिक रहिवासाची पडताळणी सुरू असताना सदर मतदार स्थलांतरीत झाले असल्याबाबत निदर्शनास आले आहेत. त्यांचे नाव कमी करणेसाठी अर्ज क्र. ७ भरून घेण्यात आला आहे. या यादी भागातील जे मतदार त्यांच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणी येत नसतील त्यांची निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्वतंत्र एसडी (अनुपस्थित/स्थलांतरीत/मृत) अशी यादी तयार करण्यात आली असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे देण्यात आले आहे.

निवडणुका नि:ष्पक्ष आणि पारदर्शक वातारणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटीबद्ध असून मतदार यादी पूर्णत: शुद्ध आणि त्रुटी विरहीत राहील यासाठी प्रशासनातर्फे सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांनीदेखील अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी केले आहे.

# ‘आनंदी जीवन जगणे’ हेच अंतिम ध्येय असावे - कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**राजदंड / हडपसर**

शिक्षण हे मूल्यवर्धनाचे साधन असून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच परिपूर्ण घडविण्यासाठी मूल्यशिक्षणाला नवीन शैक्षणिक धोरणात महत्व दिले जात आहे. जेणेकरून शिक्षण हे ज्ञान समाजात परावर्तित करण्याचे माध्यम बनावे. जगाला कशाची गरज आहे त्या क्षेत्रात पारंगत व्हावे पण शेवटी आंनदी जीवन जगणे हेच अंतिम ध्येय असावे. असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.




पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या हडपसर मधील अण्णासाहेब मगर महाविद्यालयचा पारितोषिक वितरण समारंभ वानवडी येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आला होता. या पारितोषिक वितरण समारंभात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य ॲड. संदीप कदम, प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, इंडियन आयडॉल, झी मराठी सारेगमप पुरस्कार प्राप्त, स्वराज्यरक्षक संभाजी शिर्षक गीताचे सुप्रसिद्ध पार्श्वगायक संदिप उबाळे, पोलीस उप अधीक्षक, अर्जुन पुरस्कार विजेते भारत सरकार, कॉमनवेल्थ गेम्स सुवर्णपदक विजेते पै. राहुल आवारे, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख यांच्या हस्ते १३५ गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचा गुणगौरव करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

पोलीस उपअधीक्षक राहुल आवारे यांनी आपल्याला बक्षीस मिळते तेव्हा आपली जबाबदारी वाढते. छोट्या यशावर समाधान न मानता मोठी स्वप्न बघा. आपल्या क्षमता ओळखून संघर्ष, कष्ट करत रहा यश निश्चितच मिळेल. असे सांगितले. पार्श्वगायक संदिप उबाळे यांनी बहारदार गीते सादर केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. संदीप कदम यांनी विद्यार्थीदशेत मिळालेली बक्षिसे आयुष्यभर प्रेरणा देतात. संस्थेच्यावतीने कला, क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. त्यातून अनेक खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळत असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. शुभांगी औटी, डॉ. प्रशांत मुळे, प्रा. अनिल जगताप, प्रा. विलास शिंदे, शा. शि. संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ, प्रा. अनिल दाहोत्रे, महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ. राहुल नरंगलकर, डॉ. सविता कुलकर्णी, डॉ. अण्णासाहेब निंबाळकर, आय. क्यू. ए.सी. समन्वयक डॉ. रमाकांत जोशी, जिमखाना समिती सदस्य प्रा. सचिनकुमार शहा, कार्यालयीन अधीक्षक गणेश साबळे, विद्यार्थी क्रीडा प्रतिनिधी विशाल कोलते यांनी समारंभाचे संयोजन केले. विद्यार्थी,पालक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक जवळपास ८०० लोक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवात ’मतदार राजा जागा हो’ या पथनाट्य सादरीकरणाने झाली तर सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरणाने सांगता झाली. पारितोषिक वाचन डॉ. अण्णासाहेब निंबाळकर, डॉ. वंदना सोनवले, डॉ. अशोक ससाणे, डॉ. बाजीराव शिंदे, डॉ. धीरज देशमुख, प्रा. मधुमंजरी ओक, प्रा. अनिल दाहोत्रे, प्रा. प्रितम ओव्हाळ, डॉ. शुभांगी औटी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सविता कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत मुळे यांनी मानले.

# शरद पवार यांच्याकडून दिलीप वळसे पाटील यांच्या तब्येतची विचारपूस

**राजदंड / पुणे**



घरामध्ये पाय घसरून जायबंदी झालेले राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांना दूरध्वनी करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

शरद पवार यांचे मानसपुत्र म्हणून दिलीप वळसे पाटील यांची ओळख होती. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी अजित पवार यांच्यासोबत जात शरद पवार यांना धक्का दिला होता.

एखादी राजकीय व्यक्ती जर आजारी पडली तर त्या व्यक्तीच्या सुख दु:खात सहभागी होण्याची महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्याचे दर्शन घडवत राजकीय मतभेद बाजूला ठेवून शरद पवार यांनी दिलीप वळसे पाटील यांना दूरध्वनी केला आणि त्यांच्या तब्येतीची चौकशी केली.

# गीता धनावडे या विद्यार्थिनीची ‘इस्त्रो’ प्रशिक्षणासाठी निवड

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** डीईएसच्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी गीता धनावडे हिची इस्त्रो प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.




इस्त्रोच्या ’युविका २०२४’ या कार्यक्रमाअंतर्गत ही निवड करण्यात आली. त्यासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत गीताने संपूर्ण देशात सहावा क्रमांक पटकाविला.

अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटर (एसएसी) येथे १२ ते २४ मे या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे. मुख्याध्यापिका वासंती बनकर यांनी गीताच्या यशाबद्दल तिचे आणि पालकांचे अभिनंदन केले आहे.

गीताने राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात विजेतेपद मिळविले असून, राज्यस्तरीय ऑलिंम्पियाड स्पर्धेत ही विजेतेपद प्राप्त केले. गीता जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत विजेती आहे.

# गोविंदांची मजबुरी, की संधी?

**गेल्याच आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातील शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका करताना संसदेत, विधिमंडळात सेलिब्रिटींचे काय काम असते, त्यांनी अभिनयच करावा, संसदेतील कामाचे त्यांना गांभीर्य नसते, अशी टीका केली होती; परंतु ही टीका अर्धसत्य आहे. अमिताभ बच्चन यांच्यासह काहींना संसद मानवली नाही. तिथला कारभार त्यांना पाहवेना. मासळी बाजार झालेला काहींना हा कारभार सुसह्य झाला नसेल; परंतु एनटीआर, करुणानिधी, जयललिता, जया प्रदा, जया बच्चन, रेणुका चौधरी, हेमा मालिनी, शत्रुघ्न सिन्हा अशा मोहमयी दुनियेतील कितीतरी अभिनेत्यांनी, अभिनेत्रींनी संसदेत चांगली कामगिरी केली.**



जया बच्चन यांनी तर कितीतरी विषयांवर राज्यसभेत चांगली भाषणे केली. अजित पवार एकीकडे सेलिब्रिटींवर टीका करीत असताना राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असताना सुरेखा पुणेकर, मच्छींद्र कांबळी, प्रिया बर्डे अशा कितीतरी सेलिब्रिटी त्यांच्या पक्षात होत्या. त्यापैकी काहींना उमेदवारी देण्याचे घाटत होते. ती न मिळालेल्या काहींनी पक्ष सोडला. सेलिब्रिटींचे सभागृहात काम काय, असे अजित पवार विचारीत असताना त्यांचा मित्रपक्ष असलेल्या भाजपने कंगना राणावत, हेमामालिनी यांच्यासारख्या कितीतरी सेलिब्रिटींना लोकसभेच्या निवडणुकीत उतरवले आहे. आता त्यांचा आणखी एक मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेने गोविंदा आहुजा यांना लोकसभेच्या निवडणुकीत उतरवायचे ठरवले आहे. अजितदादा आता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शिंदे यांना सेलिब्रिटीच्या उमेदवारीबद्दल बोलणार का, असा प्रश्न उपस्थित होतो. गोविंदा यांच्या शिवसेनेतील प्रवेशामुळे भाजपच्या नेत्यांचा दुटप्पीपणाही पुढे आला आहे. यापूर्वी अनिल देशमुख, खा. संजय राऊत, नबाब मलिक यांच्यावरचे गुन्हे सिद्ध होण्यापूर्वीच त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारे नेते आता गोविंदा यांच्यावरच्या आरोपाबाबत काहीच बोलणार नाहीत. तीनदा आमदार, तीनदा खासदार आणि राज्यपाल राहिलेल्या राम नाईक यांनी गोविंदा दाऊदची मदत घेऊन कसा विजयी झाला, याचा उल्लेख त्यांच्या पुस्तकात केला आहे. १९९० च्या दशकात गोविंदाच्या अभिनयाची प्रशंसा न करणारा हिंदी चित्रपटसृष्टीवर प्रेम करणारा क्वचितच कोणी असेल. सुपरस्टार गोविंदाने आपल्या कारकिर्दीत हिरो नंबर १ ते हद कर दी आपने, एक और एक गयाह, बडे मियाँ छोटे मियाँ, आंटी नंबर १, कुली नंबर १ पर्यंत अनेक सुपरहिट चित्रपट दिले. अभिनयाच्या जगात नाव कमावलेल्या गोविंदाने २००४ साली राजकारणात प्रवेश केला. तथापि, अभिनयासारखीच राजकारणातील त्याची पहिली इनिंग हिट ठरली नाही. त्यामुळे त्याला काही वर्षांतच राजकारणाला रामराम केला.

आता पुन्हा एकदा गोविंदा राजकारणात दुसरी इनिंग खेळणार आहे. त्यांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षात प्रवेश करून राजकारणाच्या दुनियेत पुन्हा पाऊल टाकले आहे. गोविंदा उत्तर-पश्चिम मुंबईतून शिवसेनेच्या शिंदे गटाच्या तिकिटावर निवडणूक लढवू शकतात. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांना आव्हान देऊ शकतात. गोविंदाने २००४ मध्ये राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसकडून ते लोकसभेवर निवडून गेले. निवडणुकीच्या वेळी त्यांनी आपले मुख्य लक्ष परिवहन, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांवर असेल असे सांगितले होते. त्यांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते राम नाईक यांचा पराभव केला; मात्र राजकारणातील गोविंदाची ही खेळी फार काळ टिकली नाही. अभिनयात सुपरस्टार राहिलेले हे 'हीरो' शूटिंगला जसे वेळेवर यायचे नाही, दांड्या मारायचे तसेच त्यांनी लोकसभेतही केले. राजकारण गांभीर्याने करायचे असते, याचा त्यांना विसर पडला. लोकसभेच्या अधिवेशनात त्यांच्या गैरहजेरीवरून अनेकदा टीका झाली होती. एकाचवेळी दोन डगरीवर हात ठेवण्याची कसरत त्यांना जमली नाही. खासदार असण्यासोबतच ते चित्रपटांमध्येही आपली कारकीर्द सुरू ठेवत होते. चित्रपट इंडस्ट्रीत एक वेळ अशी आली, की जेव्हा गोविंदा केवळ नावापुरतेच उरले. त्यांना कुणी चित्रपट देत नव्हते. २००७ मध्ये 'पार्टनर' या चित्रपटात त्याच्यासोबत काम करणाऱ्या सलमान खानने या कठीण काळात त्याचा हात धरला होता. हा चित्रपट पडद्यावर आला आणि सलमान खान आणि गोविंदाच्या जोडीला लोकांचे खूप प्रेम मिळाले. या चित्रपटाच्या यशानंतर आणि त्यांची चित्रपट कारकीर्द पुन्हा रुळावर आल्याचे पाहून त्यांनी त्यांच्या चित्रपटांवर अधिक लक्ष केंद्रित केले. त्यामुळे खासदार म्हणून त्यांना खूप टीकेला सामोरे जावे लागले. २० जानेवारी २००८ रोजी गोविंदाने राजकारण सोडून आपल्या अभिनय कारकिर्दीवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. आता शिंदे यांच्या शिवसेनेकडून गोविंदा राजकारणात आपली दुसरी इनिंग खेळणार असल्याने तो या क्षेत्रात नंबर १ बनतो की नाही हे पाहायचे आहे. हिरो नंबर वन.. राजा बाबू.. गोविंदाने आपल्या अभिनयाच्या जोरावर ही सर्व टोपणनावे मिळवली; पण २००४ मध्ये जेव्हा त्यांनी मुंबईतील एका जागेवरून निवडणूक लढवली, तेव्हा त्यांनी वचन दिले होते, की मी स्वतःला नंबर एकचा नेता म्हणून सिद्ध करीन. त्यांचे हे वचन पूर्ण होऊ शकले नाही. आता जवळपास दोन दशकांनंतर गोविंदा पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरतो आहे. कृष्णा हेगडे यांनी गोविंदा यांची मुंबईतील जुहू येथील घरी भेट घेतली. अमोल हे शिंदे गटाचेच ज्येष्ठ नेते गजानन कीर्तिकारांचा मुलगा आहे. त्यांना निवडणूक लढवण्यात रस नाही. कारण त्यांना मुलाविरोधात उभे राहून कौटुंबिक संघर्ष टाळायचा आहे. अमोलला पराभूत करण्यासाठी योग्य उमेदवार नसल्याने शिंदे गोविंदा यांना रिंगणात उतरवत आहेत. खरेतर माजी खासदार संजय निरुपम काँग्रेसवर नाराज असून त्यांचा पर्याय शिंदे यांच्यापुढे होता; परंतु त्यांनाही एक सेलिब्रिटी हवा होता. आता गोविंदा जनतेला कोणते आश्वासन देणार हे पाहावे लागेल.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेत असलेली जागा म्हणजे मुंबई उत्तर. येथून काँग्रेसचे उमेदवार गोविंदा यांचा सामना भाजपचे दिग्गज राम नाईक यांच्याशी होता. राम नाईक अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये रेल्वे मंत्री होते. नाईक यांचा अनुभव, त्यांचे संसदीय कामकाज, आमदार-खासदारांसाठी स्थानिक विकास निधी सुरू करण्यातील योगदान लक्षात घेतले, तर गोविंदा त्यांच्या पासंगालाही पुरणारे नव्हते; परंतु लोकांना अभ्यासू, काम करणारा लोकप्रतिनिधीऐवजी लोकप्रिय अभिनेता लोकप्रतिनिधी म्हणून योग्य वाटला आणि नंतर त्यांनाच आपली चूक कळली; परंतु त्यामुळे राम नाईक यांच्या राजकीय कारकिर्दीला पूर्णविराम मिळाला. गोविंदा ही निवडणूक जिंकले, तेव्हा ते त्यांच्या करिअरच्या शिखरावर होते आणि त्यांनी चित्रपटांतील काम कमी केले होते. यानंतर त्यांची कारकीर्द तशी राहिली नाही. गोविंदा यांच्याकडून पराभूत झालेल्या नाईक यांनी आपल्या 'चरैवेती चरैवेती' या पुस्तकात गोविंदा दाऊदच्या मदतीने निवडणूक जिंकले. गोविंदा यांनी अंडरवर्ल्डची मदत घेतली, असे आरोप केले. गोविंदा यांच्या वतीने दाऊदच्या गुंडांनी लोकांना धमकावले होते, असेही त्यांनी म्हटले होते; परंतु गोविंदा यांनी हे आरोप फेटाळून लावले होते. त्यानंतर गोविंदा यांना चित्रपट मिळणे बंद झाले. अवघ्या पाच वर्षांनंतर त्यांचा भ्रमनिरास झाला आणि त्यांनी सक्रिय राजकारणातून अंग काढून घेतले. त्यांनी चूक केल्याचे मान्य केले. इतकेच नाही, तर अनेक वर्षे त्यांना आपल्या चुकीचा पश्चाताप होत राहिला. अभिनेत्यांनी निवडणूक लढवू नये, असेही ते म्हणाले होते. गोविंदा यांनी सांगितले की, त्यांची ही चूक त्यांना वर्षानुवर्षे त्रास देत राहिली. राजकारणाशी निगडीत वाईट आठवणी विसरायला त्यांना दहा वर्षे लागली. त्यानंतर त्यांनी अभिनयात हात आजमावला; पण तिथेही अपयशी ठरले आणि चित्रपट चालले नाहीत. यानंतर त्यांनी पुन्हा एकदा राजकारणात प्रवेश करत मुंबईची निवड केली आहे; पण या वेळी पक्ष वेगळा आहे. तेव्हा ते काँग्रेसकडून रिंगणात होते. या वेळी शिवसेना शिंदे गटाकडून रिंगणात आहेत. कला आणि संस्कृतीसाठी काम करण्याची इच्छा त्यांनी पुन्हा व्यक्त केली आहे; मात्र आता त्यांना मजबुरी, की संधीचा सामना करावा लागत आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तरही भविष्यात दडलेले आहे, त्याचे काय परिणाम होतात हे पाहणे बाकी आहे.

## साथरोग सर्वेक्षणात राज्यात कोल्हापूर अग्रेसर : डॉ. राजेश गायकवाड

**कोल्हापूर :** एकात्मिक साथरोग सर्वेक्षण कार्यक्रमात माहे डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ निर्देशांकातील सादरीकरण व सर्वेक्षणात कोल्हापूर जिल्हा राज्यात कोल्हापूर अग्रेसर असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजेश गायकवाड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

माहे डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ अखेर प्राप्त झालेल्या गुणानुक्रम अहवालात लक्षणावर आधारित सर्वेक्षण, आजाराच्या गृहीतकांवर आधारित सर्वेक्षण, प्रयोगशालीय सर्वेक्षण, साथरोग सर्वेक्षण , साथरोग उद्रेक प्रतिसाद या सर्व निर्देशांकातील सादरीकरणात कोल्हापूर जिल्ह्याने जिल्हा महाराष्ट्र राज्यात अग्रेसर आहे.

जिल्ह्यातील ७६ प्राथमिक आरोग्य केंद्र, ४१४ उपकेंद्र, १५ ग्रामीण रुग्णालय, ५ उपजिल्हा रुग्णालय व १ जिल्हा सामान्य रुग्णालयातील एकात्मिक साथरोग सर्वेक्षण कार्यक्रमात येथील विविध संसर्गजन्य आजारांची माहिती राज्यपातळीवर आणि केंद्रस्तरावर दैनंदिन व मासिक स्वरुपात सर्वेक्षण, साथ नियंत्रण अहवाल सादरीकरण होते. या आजारात डेंगू, हिवताप, चिकुनगुनिया, झिका, कावीळ, अतिसार, कॉलरा, कोविड १९, स्वाईन फ्लू, रेबीज आदी आजारांचा समावेश आहे.

## हातकणंगलेत शिवसेनेचा अधिकृत 'मशाल' चिन्हावरच

**कोल्हापूर :** हातकणंगले लोकसभा मतदारसंघात निवडणूक शिवसेनेच्या अधिकृत 'मशाल' चिन्हावरच लढवावी लागेल, असा ठाम निर्णय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा आहे,अशी माहिती संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांनी शनिवारी दिली.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारीचा तिढा अजून सुटलेला नाही. आघाडी अंतर्गत हा मतदारसंघ शिवसेनेकडे गेला आहे. त्याबाबत उद्धव ठाकरे कोणती भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी स्पर्धा दिसून येत आहे. उमेदवारी मिळावी यासाठी



हातकणंगले विधानसभेचे माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर , जिल्हाप्रमुख संजय चौगुले व शिवसैनिक मोठ्या संख्येने आज मातोश्रीवर गेले होते. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे नवी दिल्लीला गेले होते. त्यामुळे संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांच्याशी शिष्टमंडळाने चर्चा केली. यावेळी दूधवडकर यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

निष्ठावान शिवसैनिकालाच प्राधान्याने उमेदवारी दिली जाईल. कार्यकर्त्यांनी प्रचाराला लागून मशाल चिन्ह घरोघरी पोहोचवावे. मशाल चिन्हावर जो उमेदवार पक्षाकडून दिला जाईल त्यानाच निवडून आणा.

दरम्यान, हातकणंगले मतदारसंघात शिवसेनेचा उमेदवार कोण असावा याचा निर्णय लवकरच सेनाप्रमुख उद्धव ठाकरे घेणार आहेत. याबाबत मतदारसंघात शिवसेनेचा मेळावा लवकरच होणार आहे. त्यामध्ये उमेदवाराची घोषणा करण्यात येईल.हातकणंगले साठी पक्षाकडून जो उमेदवार दिला जाईल त्याच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहू. तसेच बहुमताने निवडून आणू , अशी ग्वाही माजी आमदार डॉ मिणचेकर तसेच जिल्हाप्रमुख संजय चौगुले यांनी दिली. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक, निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते.

## शैक्षणिक संस्थांना जबाबदार धरून मुख्याध्यापक वर कारवाई करावी जनतेची मागणी

**गडहिंग्लज :** महाविद्यालयातील शिक्षकांचा वापर निवडणुकीच्या कामासाठी पूर्ण वेळ केला जातो. परंतु राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या नवीन आदेशामध्ये एखादा शिक्षक आचारसंहिता लागू झालेली असतांना कोणत्याही पक्षाच्या प्रचार सभेत, रॅलीत सहभागी झाला तर त्याला नोकरी गमवावी लागणार आहे. निवडणूक आयोगाने काढलेले हे आदेश राज्यातील खाजगी शिक्षण संस्थानाही लागू आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात संपूर्ण कारवाईचे आदेश दिले असून प्रत्येक रॅली, सभेचे चित्रीकरण होणार आहे.संपूर्ण देशामध्ये आचारसंहिता लागु झाली आहे. शैक्षणिक संस्था आणि त्यातील शिक्षक, तसेच कर्मचारी यांना कोणत्याही राजकीय पक्षाची सभा , मिरवणूक, बैठक असेल तर त्यात सहभागी झाले तर शिक्षक आणि कर्मचारी यांच्या वर कारवाईश्र करण्यात येईल. कारवाई करण्यात बाबत ग्रामसेवकांना यासंदर्भात अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अनेक शिक्षक विविध राजकीय पक्ष, संघटनाचे पदाधिकारी आहेत. संस्था चालक आपल्या राजकीय फायद्यासाठी अनेक कारणांसाठी शिक्षकांना प्रचार कामात गुंतवतो. त्यामुळे शैक्षणिक कामकाज करणे अडचणीचे ठरते हे वास्तव आहे. कारवाईचा बडगा उगारण्यात खाजगी शिक्षण संस्था असमर्थता दर्शवते. परिणामी शिक्षकांचे फावते. हे वास्तव स्वीकारून शिक्षण विभागाने कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## पिंपळवंडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात तीन शेळ्या ठार

**नारायणगाव :** पिपळवंडी ( लेंडे मळा ) ता . जुन्नर येथे आज दि ३० रोजी पहाटे अडीच ते तीन वाजण्याचा सुमारास येथील उत्तम लेंडे यांच्या गोठयातील तीन शेळ्यांवरती बिबट्याने हल्ला करून ठार केले. उत्तम लेंडे यांच्या घराशेजारील गोठया मध्ये आठ शेळ्या होत्या गोठ्याला लावलेल्या जाळीवरून बिबट्याने आत उडी मारली तेव्हा शेळ्यांचा आवाज आल्याने त्यांचे भाऊ विजय लेंडे, मनोहर लेंडे, उमेश लेंडे यांनी बॅटरी घेऊन गेले असता



तीन शेळ्या या बिबट्याने मारून टाकल्या आरडा ओरड केल्याने या बिबट्याने शेजारील मनोहर लेंडे यांच्या ऊसात पलायन केले राहिलेल्या शेळ्या घरात आणल्या.

अर्धा तास गेल्यानंतर बिबट्याने या गोठ्यात पुन्हा उडी मारली . व मारलेल्या शेळ्या खाण्यास सुरवात केली पुन्हा विजय लेंडे यांनी बॅटरी व काठीचा आवाज केल्यावर बिबट्याने पलायन केले आज सकाळी वनरक्षक संतोष साळूंके यांनी घटना स्थळी भेट देऊन पंचनामा केला या भागात वन विभागाने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी येथील शेतकरी शांताराम लेंडे युवराज लेंडे वंसत लेंडे , लहू लेंडे , सुभाष लेंडे . नामदेव लेंडे यांनी केली आहे.

## उदगावात सरपंच सदस्य करवसुलीला आपल्या दारात

### दीड कोटी कर थकीत

**जयसिंगपूर :** उदगांव येथील ग्रामपंचायतीचा कर सुमारे दिड कोटीहून अधिक थकीत असल्याने आता सरपंच मेघराज वरेकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य कर वसुलीसाठी घरोघरी फिरत आहेत. गेल्या वर्षभर राजकीय कोंडीमुळे उदगांव ग्रामपंचायतीचा कारभार पिछाडीवर गेला होता. मात्र ग्रामपंचायतीमध्ये पुन्हा सत्तांतर झाल्याने थकीत वीज बिल, कर्मचार्याचे थकीत पगार यासह विविध कामे मार्गी लावत आता वसुलीवर भर देण्यात आला आहे.

उदगांवची लोकसंख्या सुमारे २२ हजारांच्या घरात आहे. ग्रामपंचायतीचा वार्षिक कर हा सुमारे दोन ते अडीच कोटीच्या घरात आहे. शिवाय गावाचा विस्तार वाढत आहे. गावात औघोगिक



वहसात असल्याने यातूनही ग्रामपंचायतीला चांगला कर मिळतो. मात्र मोठ्या प्रमाणात कर थकीत असल्याने ग्रामपंचायतीला अर्थिक झळा बसून गावाच्या विकासाला खिळ बसत आहे. गेल्या अडीच वर्षात राजकीय कुरघोडीमुळे गावाचा विकास रखडला आहे. गेल्या चार महिन्यापुर्वी ग्रामपंचायतीमध्ये सत्तांतर होवून स्वाभिमानीने एकहाती सत्ता मिळविली आहे.

गेल्या आठ महिन्यापासून कर्मचार्याचे पगार रखडले होते. ते काढण्यात आले आहेत. विज बिल २७ लाख रुपये थकीत होते ते भरण्यात आले आहे. त्यामुळे नवीन पाणी योजनेसाठी अर्ज दाखल केला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून प्रत्येक महिन्याला ८० हजार रुपयांचा दंड भरला जात नव्हता तो आता कायमस्वरुपी निकालात काढला आहे.

गेल्या दोन वर्षात अपंग निधी दिला नव्हता तो देण्यात आला आहे. गावातील वैरण बाजारातील सर्व अतिक्रमणे काढण्यात आले आहे. ग्रामपंचायत चालविण्यासाठी थकीत कर गोळा करण्यासाठी आता सरपंच मेघराज वरेकर यांनी पुढाकार घेतला असल्याने ग्रामस्थही वसुलीला प्रतिसाद देत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे तालुक्यात प्रथमच सरपंच व सदस्य थकीत कर गोळा करण्यासाठी धडपडत आहेत.

## वाहतूक कर्मचाऱ्यामुळे वडूज शहरातील एकेरी वाहतूक व्यवस्था सुरळीत

**वडूज :** वडूज शहरात असणाऱ्या आठवडा बाजाराला होणाऱ्या गर्दीला आळा बसण्यासाठी एकेरी वाहतूक व्यवस्था करण्यात आली होती . आज वाहतूक कर्मचारी अजय भोसले व गजानन वाघमारे यांनी आपली कामगिरी पार पाडत एकेरी वाहतूक व्यवस्था अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरळीत पार पाडली. यामुळे आज आठवडा बाजारात नेहमी पटमाने होणारी वाहतूक कोंडीतून नागरिकांना मोकळीक मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की वडूज शहारात दर शनिवारी आठवडा बाजार भरला जातो. मात्र या वेळी शहरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत होती. याचा विचार करून नव्याने



**वडूज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहन धारकांना एकेरी वाहतुकीची माहिती देताना वाहतूक पोलीस कर्मचारी ( आकाश यादव, वडूज )**

रुजू झालेले पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे यांनी पुढाकार घेऊन शहरात एकेरी वाहतूक सुरु करावी यासाठी प्रयत्न केले.

गेल्या दोन दिवसापूर्वी वडूज पोलीस ठाण्यात याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी तहसीलदार बाई माने, पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, मुख्याधिकारी कपिल जगताप, व्यापारी वर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी झालेली चर्चा अशी की वडूजचा आठवडा बाजार हा शनिवारी भरत असल्याने हा बाजार वडूज - मायणी रोड लगत असणाऱ्या बाजार पठांगणावर भरत असतो. या रस्त्यावर अवजड वाहणांची वाहतूक होत असते यामुळे बाजार दिवशी याठिकाणी वाहतूकाची कोंडी मोठ्या प्रमाणात होत होती.

दरम्यान झालेल्या चर्चेतून सर्वानुमते तोडगा काढून शनिवार आठवडा बाजार दिवशी कतर खटाव मायणी कडे जाणाऱ्या वाहणांची वाहतूक हुतात्मा स्मारक , जुन्या पेठेतून करण्यात ठरवण्यात आले होते. तर आज या आठवडा बाजारात वाहतूक कर्मचारी यांनी ही वाहतूक एकेरी मार्गाने वळविल्याने आज शहरातील वाहतूक कोंडी सुटल्याचे चित्र पाहायला मिळाले. तर आज शहरात बजारासाठी आलेल्या सर्व सामान्य जनतेने पोलीस प्रशासन व नगरपंचायत प्रशासन यांचे कौतुक केले. यावेळी ग्राहरक्षक दलाचे जे. पी चौधरी , रफिक मुल्ला आदी कर्मचारी तैनात होते.

### नियमांचे पालन न केल्यास कारवाई

**आठवडा बाजार असलेल्या शनिवारी वडूज शहरात एकेरी वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी अनेक वाहणधारकांना याबाबत माहिती ही देण्यात येत आहे मात्र्यावेळी कोणी नियमांचे पालन न केल्यास त्या वाहन धारकांवर कारवाई करण्यात येणार आहे.**

**- गजानन वाघमारे**
**वाहतूक पोलीस कर्मचारी वडूज**

## नाशिककरांची रंगपंचमी उत्साहात साजरी

**नाशिक :** राज्यातील बहुतांश ठिकाणी धुलीवंदनाच्या दिवशी रंग खेळला जातो. मात्र,नाशिकमध्ये रंगपंचमीच्या दिवशीच रंगोत्सव साजरा करण्यात येतो. त्यानुसार आज पेशवे कालीन राहाडी मध्ये तसेच रेन डान्स च्या माध्यमातून शहरात सर्वत्र उत्साहात रंगोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. नाशिक शहरात सहा पेशवे कालीन राहाडी असून त्या आठ दिवसांपूर्वीच उघडण्यात आल्या होत्या. या रहाडी म्हणजेच हौदांचे विधिवत पूजन करण्यात आले. दुपारी दोन वाजेच्या सुमारास मानकऱ्यांच्या हस्ते विधिवत पूजा केल्यानंतर नैसर्गिक रंग या हौदामध्ये तयार करण्यात आला आणि त्यानंतर राहाडी मध्ये उड्या म्हणजे धप्पा घेऊन रंगोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान, दुपारी दोन ते पाच अशी पोलिसांनी राहाडी मध्ये रंगोत्सव खेळण्याची वेळ पाच वाजेपर्यंत दिली असताना अर्धा तास वाढवून देण्यात आला त्यानुसार साडेपाच वाजेपर्यंत रंगपंचमी



साजरी करण्यात आली दरम्यान शहराच्या विविध भागांमध्ये सार्वजनिक ठिकाणी देखील रंगोत्सव साजरा करण्यात आला.नाशिक पोलिसांच्या वतीने पोलीस आयुक्तालय आणि पत्रकार यांच्यामध्ये रंगपंचमी साजरी करण्यात आली तर जनस्थान ग्रुपच्या वतीने नाशिक मधील कलावंतांचे रंगमंचमी साजरी करण्यात आली या नाशिक मधील नाटकातील तसेच विविध मालिकांमधील काम करणारे कलाकार सहभागी झाले होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# भर कार्यक्रमात एमएस धोनीसमोर जाडेजा हे काय बोलून गेला!



चेन्नई सुपर किंग्स संघाचा माजी कर्णधार एमएस धोनी, रवींद्र जाडेजा आणि रचिन रवींद्र एका कार्यक्रमात सामील झाले होते. या कार्यक्रमात धोनी आणि जाडेजाने २०२३ मधील अंतिम सामन्यातील आठवणींना उजाळा दिला. २०२३ मधील आयपीएलच्या अंतिम सामन्यात चेन्नईने गुजरातचा पराभव केला होता. हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत गेले होता. यामध्ये चेन्नईला विजयासाठी एका चेंडूत ४ धावांची आवश्यकता होती. यामध्ये जाडेजाने चौकार मारत चेन्नईला पाचवं विजेतपद मिळवून दिले होते.

एमएस धोनीने यावेळी रवींद्र जाडेजाचे कौतुक केले. जाडेजाची ही खेळी खूप अस्मरणीय होती. आपल्याला टीव्हीवर पाहणे खूप सोपे वाटते मात्र हे खूप कठीण काम आहे. त्या परिस्थितीत मला विश्वास होता की जड्डूकडे कौशल्य आणि मानसिकता आहे की तो लक्ष्य पूर्ण करू शकतो. पण तरी हेच होईल, याची खात्री नसते, असं धोनी यावेळी म्हणाला. मला आनंद आहे की आम्ही जिंकलो. त्यावेळी भावना उंचबळून आलेल्या होत्या. त्यामुळे जड्डूने त्याक्षणी जशी फलंदाजी केली, त्याचे खूप कौतुक वाटते, असं धोनीनी सांगितले.

रवींद्र जाडेजा काय म्हणाला?

चेन्नईला शेवटच्या २ चेंडूवर १० धावांची गरज होती. यावेळी जडेजाने षटकार आणि मग चौकार मारत चेन्नईला विजेतेपद जिंकून दिले होते. त्यावेळी कर्णधार धोनीने त्याला उचलून आनंद व्यक्त केला होता. या क्षणाचा व्हिडिओ आणि फोटो खूप व्हायरल झाले होते. यावर जाडेजाने या कार्यक्रमात गमतीशीर प्रतिक्रिया दिली. मला वाटतं की, साक्षी भाभीनंतर मी एकच असा व्यक्ती असेल, ज्याला माही भाईने उचलले असेल, असं जडेजा म्हणाला. यानंतर सर्वच जणांना हसू अनावर झाले.

CSK ची IPL २०२४ मधील कामगिरी

चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल २०२४ मध्ये आतापर्यंत दोन सामने खेळले आहेत. दोन्ही सामने जिंकून या संघाने गुणतालिकेत पहिल्या क्रमांकाचा मुकुट कायम ठेवला आहे. ÊE» चा पहिला सामना २२ मार्च रोजी विरुद्ध होता. सीएसकेने हा सामना सहा गडी राखून जिंकला. दुसरा सामना २६ मार्च रोजी गुजरात टायटन्स विरुद्ध होता.

# सुनील नरेनने आरसीबीविरुद्ध रचला इतिहास

## टी-२०मध्ये 'हा' पराक्रम करणारा ठरला जगातील चौथा खेळाडू

**मुंबई :** आयपीएल २०२४ च्या १० व्या सामन्यात आज (२९ मार्च) कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आमनेसामने आहेत. या सामन्यात केकेआरने नाणेफक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान हा सामना खेळायला उतरताच केकेआरचा स्टार खेळाडू सुनील नरेनने एक ऐतिहासिक पराक्रम केला आहे, टी-२० फॉरमॅटमध्ये ५०० किंवा त्याहून अधिक सामने खेळणारा तो जगातील केवळ चौथा क्रिकेटपटू ठरला आहे.

कोलकाता आणि बंगळुरू यांच्यातील आयपीएल सामना फिरकीपटू सुनील नरेनसाठी खूप खास आहे. कारण हा त्याचा टी-२० फॉरमॅटमधील ५०० वा सामना आहे. त्याने आतापर्यंत ४९९ टी-२० सामने खेळले आहेत. या सामन्यांमध्ये त्याच्या नावावर ५३६ विकेट्स आहेत. त्याच्या आधी किरॉन पोलार्ड, ड्वेन ब्राव्हो आणि शोएब मलिक यांनी ही कामगिरी केली आहे. पोलार्ड हा क्रिकेटच्या या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू आहे. त्याच्या नावावर ६६० सामन्यांची नोंद आहे.




**टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने खेळणारे खेळाडू –**

किरॉन पोलार्ड – ६६० सामने

ड्वेन ब्राव्हो – ५७३ सामने

शोएब मलिक – ५४२ सामने

सुनील नरेन – ५००ङ सामने

आंद्रे रसेल – ४८३ सामने

सुनील नरेनची टी-२० कारकीर्द –

२०११ मध्ये पदार्पण केल्यापासून, नरेनने टी-२० फॉरमॅटमध्ये बॉल आणि बॅट दोन्हीसह शानदार कामगिरी केली आहे. त्याने आतापर्यंत ५३६ विकेट घेतल्या आहेत. या बाबतीत तो फक्त ड्वेन ब्राव्हो (६२५) आणि राशिद खान (५६६) मागे आहेत. नरेनचा इकॉनॉमी रेट ६.१० आहे, जो त्यांच्या टी-२० कारकिर्दीत २००० पेक्षा जास्त चेंडू टाकलेल्या खेळाडूंमध्ये दुसरा सर्वोत्तम आहे. सॅम्युअल बद्रीच्या कारकिर्दीत १९७ सामन्यांतील सर्वोत्तम इकॉनॉमी रेट ६.०८ आहे. ऑफस्पिनर नरेननेही आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत ३० मेडन षटके टाकली आहेत, जी पुरुषांच्या टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोच्च आहे.

कोलकाताने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली –

कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात अनुकुल रॉयने केकेआर संघात प्रवेश केला आहे. तर आरसीबी आपल्या प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल केलेला नाही. अशा परिस्थितीत आरसीबी प्रथम फलंदाजी करत आहे.

**दोन्ही संघांची प्लेइंग इलेव्हन –**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू: विराट कोहली, फाफ डू प्लेसिस (कर्णधार), कॅमेरॉन ग्रीन, रजत पाटीदार, ग्लेन मॅक्सवेल, अनुज रावत (यष्टीरक्षक), दिनेश कार्तिक, अल्झारी जोसेफ, मयंक डागर, मोहम्मद सिराज, यश दयाल.

कोलकाता नाइट रायडर्स : फिलिप सॉल्ट (यष्टीरक्षक), व्यंकटेश अय्यर, श्रेयस अय्यर (कर्णधार), रमणदीप सिंग, रिंकू सिंग, आंद्रे रसेल, सुनील नरेन, मिचेल स्टार्क, अनुकुल रॉय, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती.

# शाहीन आफ्रिदीची उचलबांगडी!

## PCB मध्ये कर्णधारपदावरून पुन्हा वाद, वर्ल्ड कपसाठी रणनीती




पाकिस्तान क्रिकेट बोर्ड पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. आगामी ट्वेंटी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवरपाकिस्तानसंघाचा कर्णधार बदलण्याच्या हालचालींना वेग आलाआहे. आताच्या घडीला शेजाऱ्यांच्या ट्वेंटी-२० संघाचा कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी आहे. पण, आता तो कर्णधारपद सोडणार असल्याचे कळते. येत्या जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेच्या धरतीवर ट्वेंटी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे.

शाहीन आफ्रिदी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्यावर नाराज आहे. कारण त्यांनी आणि निवडकर्त्यांनी आफ्रिदीशीचर्चा न करता त्याला कर्णधारपदावरून काढले जात असल्याचा आरोप त्याने केला. शाहीनच्या नेतृत्वात पाकिस्तानने केवळ एक ट्वेंटी-२० मालिका खेळली आहे. न्यूझीलंडविरूद्ध खेळलेल्या या मालिकेत शेजाऱ्यांना १-४ असा दारूण पराभव स्वीकारावा लागला होता.बाबर पुन्हा कर्णधार?

शाहीन आफ्रिदी कर्णधारपद सोडण्यास तयार आहे. पण बोर्डाकडून याबद्दल कोणतीही सूचना मिळाली नसल्याचे त्याने सांगितले. खरं तर माजी कर्णधार बाबर आझमवर पुन्हा एकदा ही जबाबदारी सोपवली जाण्याची दाट शक्यता आहे. या यादीत बाबर आणि मोहम्मद रिझवान यांची नावे आघाडीवर आहेत. भारतात पार पडलेल्या वन डे विश्वचषकानंतर बाबरला कर्णधारपद सोडण्यास भाग पाडले गेले. त्यानंतर कसोटी संघाची धुरा शान मसूद तर ट्वेंटी-२० संघाचे कर्णधारपद शाहीन आफ्रिदीकडे देण्यात आले.अलीकडेच पाकिस्तानी खेळाडूंनी लष्करांच्या जवानांसोबत प्रशिक्षण घेतले. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सांगितले की, पाकिस्तान लष्कराच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. आगामी काळात होणारा ट्वेंटी-२० विश्वचषक, न्यूझीलंडविरूद्धची ट्वेंटी-२० मालिका, आयर्लंड आणि इंग्लंडविरूद्धची ट्वेंटी-२० मालिका यासाठी पाकिस्तानी संघातील खेळाडूंची फिटनेस चाचणी घेण्यात आली.

## आपलं मनोरंजन

# अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर लवकरच करणार एंगेजमेंट? समोर आली नवीन माहिती



बॉलिवूड अभिनेता आदित्य रॉय कपूर आणि अभिनेत्री अनन्या पांडे त्यांच्या रिलेशनशीपमुळे बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहेत. दोघेही अनेकदा एकत्र क्वालिटी टाइम घालवताना दिसले आहेत. या जोडप्याचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतात. अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर लवकरच करणार एंगेजमेंट? समोर आली नवीन माहितीबॉलिवूड अभिनेताआदित्य रॉय कपूर आणि अभिनेत्रीअनन्या पांडे(-परपूर झरपवर्) त्यांच्या रिलेशनशीपमुळे बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहेत. दोघेही अनेकदा एकत्र क्वालिटी टाइम घालवताना दिसले आहेत. या जोडप्याचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतात. चाहत्यांनाही आदित्य आणि अनन्याची जोडी खूप आवडते. मात्र, या दोघांनी कधीही आपले नाते अधिकृत केले नाही. दरम्यान, आता या जोडप्याबद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे, जी ऐकल्यानंतर चाहत्यांचा आनंद गगनात मावेल. ते दोघेही लवकरच एंगेजमेंट करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.बॉलिवूड लाईफच्या रिपोर्टनुसार, एका जवळच्या सूत्राने सांगितले की, 'सध्या अनन्या आणि आदित्य आपापल्या करिअरमध्ये चांगले काम करत आहेत. दोघांचे वैयक्तिक आयुष्यही चांगले चालले आहे. दोघंही एकमेकांसोबत कम्फर्टेबल आहेत आणि लवकरच हे नातं पुढे नेणार आहेत. सूत्रांनी पुढे सांगितले की, 'अनन्याचे पालकही त्यांच्या मुलीच्या या निर्णयाने खूश आहेत. आदित्य आणि अनन्या लवकरच एंगेजमेंट करू शकतात. ते त्यांच्या चाहत्यांना ही बातमी कधी आणि कशी शेअर करणार आहेत हे आम्हाला माहीत नाही. एकतर ते घोषणा करतील किंवा थेट सोशल मीडियावर फोटो शेअर करून सांगतील. आदित्य अनन्याच्या कुटुंबाच्या खूप जवळ आहे. अलीकडेच, त्याने अभिनेत्रीच्या बहिणीच्या बेबी शॉवरला देखील हजेरी लावली होती, ज्यामध्ये फक्त अनन्याचे कुटुंब उपस्थित होते.चंकी पांडेनेही दिला होकार

काही दिवसांपूर्वी झूम टीव्हीने आदित्य आणि अनन्याबद्दल इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली होती, जी अभिनेत्रीचे वडील चंकी पांडे यांनीही लाईक केली होती. तेव्हापासून त्यांच्या लग्नाच्या बातम्यांना जोर धरला होता. अलीकडेच अनन्या नेहा धुपियाच्या चॅट शोमध्ये आली होती, जिथे तिने तिच्या नात्याबद्दल खुलेपणाने सांगितले. जेव्हा नेहाने अनन्याला तिच्या आणि आदित्यच्या नात्याबद्दल विचारले तेव्हा अभिनेत्रीने उत्तर दिले की 'आम्ही दोघे फक्त मित्र नाही तर खूप चांगले मित्र आहोत'.

# 'मिस युनिव्हर्स'मध्ये प्रथमच सौदीची सुंदरी!




महिलांना मोठ्या प्रमाणात सूट, सवलती आणि मुख्य म्हणजे 'महिला' म्हणून ज्या अनेक गोष्टी आजपर्यंत त्यांच्या देशांत अमान्य होत्या, त्यातल्या अनेक गोष्टींना आता त्यांनी परवानगी दिली आहे. 'मिस युनिव्हर्स'मध्ये प्रथमच सौदीची सुंदरी!सौदी अरेबियाचीप्रतिमा कायम रूढीवादी, परंपराप्रिय अशीच होती, पण गेल्या काही वर्षांत या देशानं अक्षरश: कात टाकली आहे आणि त्यांच्या दृष्टीनं अतिशय प्रागतिक निर्णय घेण्याचा झपाटा त्यांनी लावला आहे. अर्थातच आपल्या देशाला कोणीही 'मागास' म्हणू नये आणि विकसित देशांच्या किमान मांडीला मांडी लावून तरी बसता येईल, या दृष्टीनं सौदीचे क्राउन प्रिंस मोहम्मद बिन सलमान यांचा प्रयत्न आहे. महिलांच्या दृष्टीनं तर या देशानं अलीकडे खूपच प्रागतिक असे निर्णय घेतले आहेत.महिलांना मोठ्या प्रमाणात सूट, सवलती आणि मुख्य म्हणजे 'महिला' म्हणून ज्या अनेक गोष्टी आजपर्यंत त्यांच्या देशांत अमान्य होत्या, त्यातल्या अनेक गोष्टींना आता त्यांनी परवानगी दिली आहे. गेली कित्येक वर्षे तर महिलांना साधा कार चालवण्याचाही हक्क नव्हता. पण तो हक्क त्यांना अलीकडच्या काही वर्षांत मिळाला आहे. त्याशिवाय ट्रेन चालवणाऱ्या, विमान चालवणाऱ्या महिला आतासौदी अरेबियातदिसायला लागल्या आहेत. इतकंच काय सौदी अरेबियातील महिलांसाठी आता अंतराळात जाण्यासाठीही मज्जाव नाही.या पार्श्वभूमीवर एका घटनेनं सगळ्या जगाचं लक्ष सौदी अरेबियाकडे वेधून घेतलं आहे. सौदी अरेबियाची सौंदर्यवती आता चक्क 'मिस युनिव्हर्स' स्पर्धेतही भाग घेणार आहे. याआधी या स्पर्धेत भाग घेण्याची सौदीच्या सौंदर्यवतींना परवानगी नव्हती. रुमी अल-कहतानी या सुंदरीच्या रूपानं सौदी अरेबिया पहिल्यांदाच या स्पर्धेत आता दिसेल! रुमी स्वत:च या बातमीनं अतिशय उत्साहित झाली असून देशातील नागरिकांनी, इतकंच काय परदेशी नागरिकांनीही याबाबत सौदी अरेबियाचं अभिनंदन करताना रुमीला शुभेच्छा दिल्या आहेत. २७ वर्षीय रुमी सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथील रहिवासी असून पेशाने ती मॉडेल असून सोशल मीडिया एन्फ्लूएन्सर आहे.सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर तिचे दहा लाखांपेक्षाही अधिक फॉलोअर्स आहेत. या वर्षीच्या अखेरीस मेक्सिको येथे होणाऱ्या मिस युनिव्हर्स सौंदर्य स्पर्धेत रुमी आपल्या देशाची अधिकृत प्रतिनिधी असेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे मिस युनिव्हर्स स्पर्धेत स्विम सूट इव्हेंट नसतो. कदाचित यामुळेही रुमीला या स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी मिळाली असेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. याच तोडीची दुसरी आणि तितकीच मानाची स्पर्धा म्हणजे 'मिस वर्ल्ड'! या स्पर्धेत सौदी अरेबियाच्या सुंदरीला प्रतिनिधित्व मिळेल का, याविषयीचे अंदाज आता बांधले जात आहेत. कारण 'मिस वर्ल्ड' स्पर्धेत स्विम सूट हा इव्हेंट असतो. काहीही असो, मिस युनिव्हर्स स्पर्धेत सौदी अरेबियाची सुंदरी अधिक प्रतिनिधी म्हणून जगातील इतर सौंदर्यवतींशी स्पर्धा करताना दिसेल ही खूप मोठी घटना मानली जात आहे.

# कुणीतरी येणार येणार गं' लिटिल चॅम्प कार्तिकी होणार आई!

'सा रे ग म प' या गाण्याच्या शोचं अत्यंत गाजलेलं पर्व म्हणजे 'लिटिल चॅम्प्स'. या शोमधील सर्वच लिटिल चॅम्प्स आजही चाहत्यांच्या लक्षात आहेत. या शोमधून घराघरांत पोहोचलेली आणि त्या पर्वाची विजेती गायिका म्हणजे कार्तिकी गायकवाड. कार्तिकी आपल्या गाण्याचे अनेक कार्यक्रम करत असते. तसेच अनेक मराठी चित्रपटांतून गाणी व मालिकांची शीर्षकगीते तिने गायली आहेत. ती सोशल मीडियावरही सक्रिय असते. त्यामुळे तिचा चाहतावर्ग मोठा आहे. त्यातच कार्तिकीने आता तिच्या चाहत्यांसाठी एक अत्यंत आनंदाची व गोड बातमी दिली आहे. कार्तिकी लवकरच आई होणार आहे. नुकतेच तिचे डोहाळेजेवण पार पडले असून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



कार्तिकी चार वर्षांपूर्वी २०२० मध्ये रोनित पिसेसोबत लग्नबंधनात अडकली. या दोघांचे अरेंज मॅरेज आहे. त्यांच्या शाही विवाह सोहळ्याची सोशल मीडियावर बरीच चर्चा झाली होती. त्यानंतर आता लग्नाच्या चार वर्षांनंतर कार्तिकी आई होणार आहे.

कार्तिकीच्या डोहाळ जेवणाच्या कार्यक्रमाचा व्हिडीओ षळश्रश्रग्रुरश्र या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. हा व्हिडीओ पाहून चाहत्यांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

कार्तिकीचे खास डोहाळे जेवणाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. पारंपरिक पद्धतीने कार्तिकीचं डोहाळे जेवण करण्यात आलं. डोहाळे जेवणासाठी कार्तिकीने हिरव्या रंगाची साडी नेसली होती. चेहऱ्यावर दिसून येत असलेल्या ग्लोमुळे कार्तिकीचं सौंदर्य आणखीच खुलून आलं होतं. कार्तिकीच्या डोहाळे जेवणात ती आणि तिचा नवरा रोहित ट्रेडिशनल लूकमध्ये दिसले.

# नवनीत राणांनी घेतले केंद्रीय गृहमंत्र्यांचे आशीर्वाद; म्हणाल्या, "भाजपा कार्यकर्ता..."



**नवी दिल्ली ':** देशभरात सध्या निवडणुकांचे वारे वाहतेय. उमेदवारीवरुन महायुती असो किंवा महाविकास आघाडी या दोघांमध्येही मतभेद असल्याचे दिसून आले. यात अमरावतीची जागा हॉट स्पॉट झालीय. त्यातच शुक्रवारी भाजपा उमेदवार नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवी राणा यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

अमरावतीमध्ये बंडोबा : अमरावतीच्या जागेववरुन महायुतीमध्ये वाद असल्याचे समोर आले होते. शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ यांना किंवा त्यांचे पुत्र अभिजीत अडसूळ यांना उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न केले जात होते. मात्र, भाजपाने नवनीत राणा यांना उमेदवारी जाहीर केली आणि अमरावतीमध्ये बंडाचे राजकारण सुरू झाले. अभिजीत अडसूळ यांनी अपक्ष म्हणून ही निवडणूक लढवणार असल्याची घोषणा गुरुवारी केली होती.

राणा यांच्याविरोधात सर्व एकत्र : २०१९ मध्ये नवनीत राणा या राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्या मदतीनं निवडूण आल्या होत्या. त्यानंतर राणा यांची विधानं ही भाजपाला पूरक होती. त्यामुळं भाजपानं २०२४ च्या लोकसभेसाठी नवनीत राणा यांना थेट अमरावतीमधूनच निवडणुकीच्या रिंगणात उतरवलंय. त्यामुळं स्थानिक शिवसेनेचे नेते नाराज झाले. अभिजीत अडसूळ, आमदार बच्चू कडू यांनी तर थेट नवनीत राणा यांचा प्रचार करण्यास नकारच दिलाय. त्यामुळं महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांची डोकेदुखी वाढली.

नवनीत राणांचा भाजपा प्रवेश : लोकसभेच्या निवडणुकीत नेत्यांचे पक्षप्रवेश आणि पक्षांतर सातत्यानं होत आहेत. खासदार नवनीत राणांना भाजपाकडून प्रथम उमेदवारी दिली. त्यानंतर त्यांनी भाजपाचं कमळ हाती घेतलंय. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नागपूरच्या कोराडी येथील निवासस्थानी असलेल्या जनसंपर्क कार्यालयात हा पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करणार असल्याचे नवनीत राणा यावेळी म्हणाल्या.

# ड्रीम गर्ल हेमा मालिनी यांच्या विरोधात मथुरेतून बॉक्सर विजेंदर सिंह लढवणार निवडणूक?





**राजदंड न्यूज नेटवर्क :** ड्रीम गर्ल हेमा मालिनी यांच्या विरोधात मथुरेतून बॉक्सर विजेंदर सिंह लढवणार निवडणूक?उत्तर प्रदेशमध्येकाँग्रेसयावेळी समाजवादी पक्षासोबत इंडिया आघाडी अंतर्गत निवडणूक लढवत आहे. या आघाडीअंतर्गत काँग्रेसला लोकसभेच्या १७ जागा मिळाल्या आहेत.

या १७ जागांपैकी पक्षाने आतापर्यंत १३ जागांसाठी उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. तर चार जागांवर चर्चा सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेस यावेळी राज्यात काहीतरी नवीन प्रयोग करण्याच्या तयारीत आहे.काँग्रेसने अद्याप उत्तर प्रदेशच्या मथुरा लोकसभेच्या जागेसाठी उमेदवाराचं नाव जाहीर केलेलं नाही. या जागेवरभाजपानेपुन्हा एकदा ड्रीम गर्लहेमा मालिनीयांना उमेदवारी दिली आहे. या जागेवरून त्या सलग दोनवेळा विजयी झाल्या आहेत. यावेळीहेमा मालिनीविजयाची हॅट्ट्रिक करण्याच्या तयारीत आहेत.काँग्रेस बॉक्सर विजेंदर सिंहला या जागेवरून उमेदवारी देऊ शकते. मात्र, त्यांच्या नावावर पक्षात सध्या चर्चा सुरूच आहे. सूत्रांवर विश्वास ठेवला तर, या जागेसाठी आणखी काही नावं देखील शर्यतीत असल्याचं म्हटलं जात आहे,

मात्र या सर्वांमध्ये विजेंदर सिंहचं नाव आघाडीवर आहे.काँग्रेसने २८ मार्च रोजी उत्तर प्रदेशच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली होती. त्यानंतर काँग्रेसने डॉली शर्मा यांना गाझियाबादमधून उमेदवारी दिली होती. याशिवाय महाराजगंजचे आमदार वीरेंद्र चौधरी, सीतापूरमधून नकुल दुबे आणि बुलंदशहरमधून शिवराम वाल्मिकी यांना तिकीट

# भारताला कायद्याचे पालन करण्याबाबत कोणत्याही देशाकडून धडे घेण्याची गरज नाही : उपराष्ट्रपती

**नवी दिल्ली :** भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे आणि त्याच्याकडे एक मजबूत न्यायव्यवस्था आहे जिच्याशी कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही गटाकडून तडजोड केली जाऊ शकत नाही उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटले आहे. भारतीय लोकशाही अद्वितीय असल्याचे नमूद करत उपराष्ट्र्पती म्हणाले की, भारताला कायद्याचे पालन करण्याबाबत कोणाकडून धडे घेण्याची गरज नाही.

आज नवी दिल्ली येथे भारतीय लोकप्रशासन संस्थेच्या (आयआयपीए) ७० व्या वर्धापन दिन सोहळ्याला संबोधित करताना, धनखड म्हणाले की आज भारतात ''कायद्यासमोर सगळे समान हा एक नवीन नियम आहे'' आणि जे स्वत:ला कायद्याच्या वरचढ समजतात त्यांना कायदा जबाबदार धरत आहे. ''मात्र आपल्याला काय दिसते? ज्या क्षणी कायद्याची अंमलबजावणी सुरु होते , तेव्हा ते लोक रस्त्यावर उतरतात, उच्चरवात वाद घालतात , मानवाधिकारांच्या आडून, वाईट स्वरूपाचे गुन्हे लपवतात आणि हे सगळे आपल्या डोळ्यासमोर घडत आहे,'' असे ते म्हणले.

भारतीय न्यायव्यवस्था मजबूत, लोकाभिमुख आणि स्वतंत्र असल्याचे अधोरेखित करत त्यांनी सवाल केला , ''कायद्याची अंमलबजावणी सुरू असताना एखाद्या व्यक्तीने किंवा एखाद्या संस्थेने किंवा संघटनेने रस्त्यावर उतरण्याचे औचित्य काय?''

या मुद्द्यावर सखोल विचारमंथन करण्याचे आवाहन धनखड यांनी केले. ''लोक अशा वातावरणात काम करू शकतील जी कायद्याच्या राजवटीपासून दूर जाण्याची विनाशी प्रवृत्ती आहे ? कायद्याचे उल्लंघन करणारेच, पीडित असल्याचा दावा कसा काय करू शकतात ? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. यावेळी उपराष्ट्रपतींनी भारतीय लोकप्रशासन संस्थेच्या नूतनीकरण केलेल्या संकुलाचे देखील उद्घाटन केले आणि आयआयपीएच्या अनेक प्रकाशनांचे विमोचन केले.

आयआयपीएचे महासंचालक सुरेंद्र नाथ त्रिपाठी, आयआयपीएचे निबंधक अमिताभ रंजन आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## भाजपाची जाहीरनामा समिती जाहीर; महाराष्ट्रातील दोन नेते, फडणवीसांना स्थान नाही

**राजदंड न्यूज नेटवर्क :** भाजपाने काही दिवसांपूर्वी देशातील आणि महाराष्ट्रातील स्टार प्रचारकांची यादी भाजपाने घोषित केली. भाजपाची जाहीरनामा समिती जाहीर; महाराष्ट्रातील दोन नेते, फडणवीसांना स्थान नाहीमुंबई - लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून पहिल्या टप्प्यात पार पडत असलेल्या लोकसभा निवडणुकांसाठी उमेदवारांनी अर्जही भरले आहेत. विदर्भातभाजपाचेवरिष्ठ नेते नितीन गडकरी आणि सुधीर मुनगंटीवार यांनीही अर्ज दाखल केले आहेत. तर, दुसरीकडे महायुतीतील जागावाटप अंतिम टप्प्यात असून लवकरच चित्र स्पष्ट होईल. भाजापकडून शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध रितीनेनिवडणूककार्यक्रम आणि जबाबदाऱ्यांचं वाटप केलं जात आहे.भाजपाकडूनआतानिवडणूकजाहीरनामा समितीची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये, महाराष्ट्रतील दोन नेत्यांना स्थान देण्यात आलं आहे.

भाजपाने काही दिवसांपूर्वी देशातील आणि महाराष्ट्रातील स्टार प्रचारकांची यादी भाजपाने घोषित केली. त्यानंतर, देशभरातील प्रभारी आणि सहप्रभारी नेतेही ठरवण्यात आले होते. त्यात, महाराष्ट्रातील निवडणुकांसाठी प्रभारी व सहप्रभारीही ठरवण्यात आले. आता, भाजपाकडून जाहीरनामा समितीची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये, महाराष्ट्रातील दोन नेत्यांना स्थान देण्यात आलं आहे. केंद्रीयमंत्री पियुष गोयल आणि भाजपाचे सरचिटणी विनोद तावडे यांना स्थान मिळाले आहे.

# चीनला काहीही बडबडू दे, आम्ही स्पष्टच सांगतोय अरूणाचल प्रदेश भारताचाच; परराष्ट्र मंत्रालयाचे सडेतोड प्रत्युत्तर



**राजदंड न्यूज नेटवर्क :** भारत आणि चीन यांच्यातील राजकीय संबंध गेल्या काही वर्षांपासून तणावाचे बनले आहेत. चीनसातत्याने शेजारील देशांवर आपली सत्ता गाजवण्याचा प्रयत्न करत आहे.भारतातहीचिनी घुसखोरीचा प्रयत्न होताना सतत दिसतो. पण भारत सरकार आणि भारतीय लष्कर चीनचा प्रयत्न प्रत्येक वेळी हाणून पाडते. नुकताच भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने गुरुवारी चीनला जोरदार प्रत्युत्तर दिले.

अरुणाचल प्रदेशहा भारताचाच हिस्सा आहे आणि तो कायम भारतातच राहिल, असे भारताने ठणकावून सांगितले. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की चीनने कितीही वेळा आपल्या बेताल दाव्यांची पुनरावृत्ती केली तरी,अरुणाचल प्रदेशआमचा भाग होता, आहे आणि नेहमीच राहील ही आमची भूमिका बदलणार नाही.परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी पत्रकार परिषदेत चीनने अरुणाचल प्रदेशवर आपला दावा सुरू ठेवल्याच्या प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी सोमवारी चीनच्या दाव्याचा पुनरुच्चार केल्यानंतर काही दिवसांतच भारताकडून या दाव्याला प्रत्युत्तर देण्यात आले. चीनला प्रत्युत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, अरुणाचल प्रदेशच्या मुद्द्यावर आम्ही वारंवार सांगितले आहे की, चीन आपले बिनबुडाचे दावे हवे तितक्या वेळा करू शकतो, आमचा मुद्दा बदलणार नाही. अरुणाचल प्रदेश भारताचा भाग होता, आहे आणि राहील. याआधीही भारताने एका निवेदनात म्हटले होते की, भारतीय नेत्यांच्या अरुणाचल दौऱ्याला चीनचा विरोध मूर्खपणाचा आणि निराधार आहे. चीनने काय केला दावा?भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे उत्तर चीनच्या दाव्यानंतर दिले. चीनने अरुणाचल प्रदेश हा चीनचा भाग असल्याचे सांगितले होते. चीनच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते कर्नल झांग झियाओगांग यांनी १५ मार्च रोजी एक निवेदन जारी करून भारतीय नेत्यांच्या अरुणाचल दौऱ्याला विरोध केला होता. पंतप्रधान मोदींनी नुकतेच अरुणाचल प्रदेशमधील सेला बोगद्याचे उद्घाटन केले होते. त्यानंतर चीनचे हे वक्तव्य समोर आले होते. ज्यामध्ये चीनने म्हटले की, 'जिजांग (तिबेटचे चिनी नाव) हा चीनचा भाग आहे आणि चीन भारतीय नेत्यांचा तथाकथित अरुणाचल प्रदेश कधीही स्वीकारणार नाही आणि त्याचा कडक विरोध करेल.' मात्र, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने चीनला जोरदार प्रत्युत्तर देत चीनचे असे दावे फेटाळून लावले आहेत.

# ८ कोटी लोक उपाशी, तरीही अन्नाची नासाडी



**नैरोबी (केनिया) :** २०२२ मध्ये जागतिक स्तरावर उत्पादित झालेल्या अन्नापैकी सुमारे १.०५ अब्ज (१८ टक्के) मेट्रिक टन जगाने वाया घालवले, असे संयुक्त राष्ट्रांच्या एका नवीन अहवालात म्हटले आहे.

अहवाल २०३० पर्यंत अन्न नासाडी निम्मी करण्यासाठी देशांच्या प्रगतीचा मागोवा घेतो. अहवाल देणाऱ्या देशांची संख्या २०२१ मधील पहिल्या अहवालापेक्षा जवळपास दुप्पट झाली आहे. २०२१ च्या अहवालात असा अंदाज आहे की, २०१९ मध्ये जागतिक स्तरावर उत्पादित झालेल्या अन्नांपैकी १७ टक्के किंवा ९३१ दशलक्ष मेट्रिक टन (१.०३ अब्ज टन) वाया गेले; परंतु अनेक देशांकडे पुरेसा डेटा नसल्यामुळे लेखकांनी थेट तुलना न करण्याचा इशारा दिला.

**जगभरात अनेक ठिकाणी अन्नसंकट**

संशोधक क्लेमेंटाईन ओकॉनर म्हणाले, अन्न नासाडी निर्देशांक सर्व काही सांगत नाही. परंतु, सहकार्य आणि पद्धतशीर कृतीद्वारे ही समस्या हाताळली जाऊ शकते.

हा अहवाल अशावेळी आला आहे, जेव्हा जगभरातील ७ कोटी ८३ लाख लोकांना दीर्घकाळ उपासमारीचा आणि अनेक ठिकाणी अन्न संकटाचा सामना करावा लागतो. अहवालात म्हटले आहे की, केनियामध्ये अन्नाचा अपव्यय ही चिंताजनक बाब आहे. दरवर्षी अंदाजे ४.४५ दशलक्ष टन अन्न वाया जाते.

# काँग्रेस 'रोजगार क्रांती' सुरू करेल, सत्तेत आल्यास...; मल्लिकार्जुन खरगेंनी थेट सांगितलं



**राजदंड न्यूज नेटवर्क :** काँग्रेसनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी, उद्योजकता सक्षम करण्यासाठी आणि तरुणांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीकाँग्रेसठोस पावले उचलून 'रोजगार क्रांती' सुरू करेल. तरुणांचे भवितव्य उज्वल होईल याची काँग्रेस गॅरेंटी देतं असं म्हटलं आहे. तसेच युवा न्याय गॅरेंटीचा पुनरुच्चार केला, जी पक्षाने सत्तेत आल्यास अंमलात आणण्याचं आश्वासन दिलं आहे.मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केलं आहे. काँग्रेस पक्ष युवा न्याय गॅरेंटीद्वारे 'रोजगार क्रांती' आणेल. रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी, उद्योजकता सक्षम करण्यासाठी आणि तरुणांची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही ठोस पावले उचलू.''भारती भरोसा' हमी अंतर्गत, त्यांचा पक्ष रोजगार कॅलेंडरनुसार ३० लाख नवीन केंद्र सरकारच्या नोकऱ्या देईल. 'पहेली नौकरी पक्की' अंतर्गत, पक्ष सर्व शिक्षित तरुणांना प्रति वर्ष १ लाख रुपये दराने एक वर्षाच्या एप्रेंटिसशिपचा अधिकार देईल. 'पेपर लीकपासून स्वातंत्र्य' या हमी अंतर्गत, पक्ष सर्व पेपर लीक पूर्णपणे बंद करण्यासाठी कायदा आणेल मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.पक्षाने 'गिग वर्कर्स'साठी चांगली कामाची परिस्थिती आणि सामाजिक सुरक्षा आणि तरुणांसाठी ५,००० कोटी रुपयांचा 'स्टार्टअप फंड' देण्याचे आश्वासन दिले आहे. करारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'गिग वर्कर' म्हणतात. महिला न्याय, युवा न्याय, कामगार न्याय, शेतकरी न्याय आणि समान न्याय या पाच न्याय तत्त्वांनुसार काँग्रेसने लोकसभा निवडणुकीच्या २५ गॅरेंटीवर लक्ष केंद्रित केले आहे. सत्तेत आल्यास त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आश्वासन खरगे यांनी दिले आहे.

# 'जेम' कडून खरेदी होणाऱ्या सेवांमध्ये २०५ % वाढ

**नवी दिल्ली :** 'जेम' अर्थात गव्हर्न्मेंट ई मार्केटप्लेस ने चालू आर्थिक वर्षात सकल व्यापारी मूल्यात(३१%) ४ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत हे मूल्य दुप्पट झाले आहे. यामधून या पोर्टलची वैशिष्ट्यपूर्ण डिजिटल क्षमता आणि कार्यपद्धतीचा आवाका दिसून येत आहे, ज्यामुळे सार्वजनिक खरेदीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सुलभता निर्माण झाली आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात जीएमव्हीमध्ये वाढ होण्यामागे जेम पोर्टलच्या माध्यमातून होणाऱ्या विविध प्रकारच्या सेवांच्या खरेदीचे बळ केंद्रस्थानी आहे. या जीएमव्हीपैकी सुमारे ५०म मूल्य सेवांच्या खरेदीशी संबंधित आहे, ज्यामधून गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत सेवांच्या खरेदीत २०५म इतकी उल्लेखनीय वाढ दिसत आहे. बाजाराची उपलब्धता सुलभ करून, प्रस्थापित आणि प्रसिद्ध सेवा पुरवठादारांची मक्तेदारी मोडीत काढून लहान स्थानिक उद्योजकांना कोणत्याही भागातून कोणत्याही वेळी सरकारी निविदांमध्ये सहभागी होण्याचा मार्ग खुला करून देण्यात हे पोर्टल अतिशय मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरले आहे. जेमवर अतिशय मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या सेवांच्या भांडारामुळे राज्यांच्या त्यांच्या गतिशील गरजांची पूर्तता करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय मिळवणे शक्य झाले आहे.

राज्यांच्या वाढत्या सहभागामुळे देखील जीएमव्हीमध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात गुजरात, उत्तर प्रदेश आणि दिल्ली यांसारख्या सर्वाधिक खरेदीदार राज्यांनी या वर्षाच्या सार्वजनिक खरेदीचे निर्धारित लक्ष्य सहज पार करण्यात राज्यांना मदत केली आहे. मंत्रालये आणि सीपीएसई यांसारख्या केंद्रीय संस्थांनी दिलेल्या योगदानामुळे देखील सकल व्यापारी मूल्यात भरीव वाढ झाली आहे. या सरकारी संघटनांनी ४ लाख कोटी रुपयांच्या या महत्त्वाच्या टप्प्यामध्ये जवळपास ८५ म योगदान दिले आहे. कोळसा मंत्रालय, ऊर्जा मंत्रालय आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि त्यांचे विभाग केंद्रीय पातळीवरील सर्वात मोठे खरेदीदार ठरले आहेत.

१.५ लाखांपेक्षा जास्त सरकारी खरेदीदार आणि २१ लाख विक्रेते आणि सेवा पुरवठादार यांच्या महाकाय जाळ्याने ही असामान्य कामगिरी शक्य करून दाखवली आहे. शेवटच्या टोकावर असलेला खरेदीदार आणि विक्रेता यांच्या सर्वसमावेशक सहभागामुळे जेम या पोर्टलला तळागाळापर्यंत संपर्क प्रस्थापित करता आला आहे. ८९४२१ पंचायती आणि ७६० पेक्षा जास्त सहकारी संस्थाना आपल्या खरेदी परिसंस्थेमध्ये एकत्र करून जेम ने प्रशासनाच्या शेवटच्या स्तरापर्यंत सुयोग्य पद्धतीने सार्वजनिक खर्च सुनिश्चित करून शाश्वत खरेदी सुविधा उपलब्ध केली आहे.

'व्होकल फॉर लोकल', 'एक जिल्हा एक उत्पादन', 'स्टार्टअप रनवे', 'वुमनिया' इ. सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिक व्यवसायांना विकसित होण्यासाठी आणि भरभराट करण्यासाठी समान संधी उपलब्ध करून दिली आहे. ४ लाख कोटी रुपयांच्या जीएमव्हीपैकी मालाचा पुरवठा करण्याच्या सुमारे ५० म मागण्या या कारागीर, विणकर, शिल्पकार, मध्यम, लघु उद्योजक विशेषत: महिला प्रणित आणि अनुसूचित जातीजमाती, बचत गट, एफपीओज आणि स्टार्ट अप्स अशा विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या वंचित गटातील विक्रेत्यांना दिल्या आहेत. ५.२ लाखांपेक्षा जास्त सीएससीज आणि १.५ लाखांपेक्षा जास्त भारतीय टपाल कार्यालयांच्या सहकार्याने जेम ने सूक्ष्म स्तरावर आपला संपर्क प्रस्थापित करण्यात आणि क्षमता वृद्धी करण्यात एक मोठे बळ म्हणून काम केले आहे. विविध प्रकारचे विक्रेते आणि सेवा पुरवठादारांना जेम वर आपला व्यवसाय वाढवता यावा यासाठी प्रत्येक पावलावर त्यांना मदतीचा हात पुढे करत या मंचाने भारतामधील वेगवेगळ्या प्रदेशातील स्थानिक अर्थव्यवस्थांना मोठी झेप घेण्यासाठी मोठी ताकद दिली आहे, ज्यामुळे रोजगार निर्मिती आणि उत्पन्नात वाढ झाली आहे'', जेम चे सीईओ पी. के सिंग यांनी सांगितले.

त्यापूर्वी चालू आर्थिक वर्षात जेम ने वापरकर्त्यांचा पोर्टल वापरण्याचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी, पारदर्शकतेत वाढ करण्यासाठी आणि अधिक समावेशकता आणण्यासाठी नव्या युगातील तंत्रज्ञानाचा अंगिकार करून एका अधिक विविधतापूर्ण आणि सुरक्षित तंत्रज्ञानविषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनाने टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस या तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या उद्योगासोबत भागीदारी केली आहे.

सध्याचा मंच कायम राखत नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन आधुनिक तोडगे निर्माण करणे, नवीन रचना करणे आणि त्याला नवे रुप देणे हा यामागील उद्देश आहे. विविध खरेदीदार संघटना आणि विक्रेतेसेवा पुरवठादारांना गतिशील गरजांसह या मंचावर सामावून घेण्याची प्रक्रिया जास्त सखोल कॉन्फिगरेबिलिटीमुळे सोपी होईल.

१२०७० पेक्षा जास्त उत्पादने आणि ३२० पेक्षा जास्त सेवा उपलब्ध करून देणारा जेम हा मंच अतिशय सहजतेने सार्वजनिक खरेदी करण्यासाठी एका छत्राखाली सर्व प्रकारची उत्पादने असलेले विक्री केंद्र बनला आहे. ज्यामुळे विक्रेते आणि सेवा पुरवठादारांना त्यांच्या उत्पादने आणि सेवांचे प्रदर्शन करून सरकारी निविदांमध्ये सर्वात जास्त पारदर्शक पद्धतीने सहभागी होण्याची संधी मिळाली आहे आणि व्यवसायसुलभता निर्माण झाली आहे.

२०१६ मध्ये ४२२ कोटीं रुपयांचे जीएमव्ही असलेल्या या पोर्टलने ४ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडण्याची मोठी भरारी घेतली आहे. अतिशय कमी कालावधीत केलेल्या या मोठ्या कामगिरीमुळे जागतिक पातळीवर हे पोर्टल सार्वजनिक खरेदी करणाऱ्या आघाडीच्या मंचांपैकी एक बनले आहे. कार्यक्षमता, पारदर्शकता आणि समावेशकतेमध्ये वाढ करण्यासाठी वचनबद्ध असलेले जेम सार्वजनिक खरेदीमध्ये मोठा बदल घडवत आहे.

# दिल्ली-मेरठ एक्स्प्रेस वेवर मोठा अपघात

**दिल्ली :** मेरठ एक्स्प्रेस वेवर मोठा अपघात; स्कूल व्हॅनची डंपरला धडक, दोघांचा मृत्यू, ९ जण जखमीगाझियाबादच्या दिल्ली मेरठ एक्स्प्रेस वेवर स्कूल व्हॅन आणि डंपर यांच्यात झालेल्या धडकेनंतर शनिवारी सकाळी भीषणअपघातझाला. याअपघातातस्कूल व्हॅनचा चालक आणि एका मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्कूल व्हॅनमध्ये ड्रायव्हर व्यतिरिक्त ११ मुलं प्रवास करत होती ज्यांचा अपघात झाला. या घटनेनंतर जखमी मुलांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सर्वजण अमरोहाहून दिल्ली जामिया विद्यापीठाकडे जात होते.मुलांचं वय अंदाजे १० ते १३ वर्षे असल्याचं सांगण्यात येत आहे. हा अपघात एवढा भीषण होता की, चालक आणि एका मुलाचा जागीच मृत्यू झाला. उर्वरित जखमींना गाझियाबादच्या वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, पोलीस अपघाताचा तपास करण्यात व्यस्त आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, स्कूल व्हॅनचं मोठं नुकसान झालं.शनिवारी सकाळी ६.३० ते ७.०० च्या दरम्यान शाळकरी मुलांना घेऊन जाणारी एर्टिगा कार दिल्लीतील जामियाला जात असताना ही घटना घडली. सर्व मुलं अमरोहा जिल्ह्यातील रहिवासी आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू केले.

अपघातग्रस्त गाडीतून मुलांना बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात आले.गंभीररित्या जखमी झालेल्या मुलांना जवळच्या मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर इतर मुलांना सर्वोदय आणि सीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. किरकोळ जखमी मुलाला एमजी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस या संपूर्ण अपघाताचा तपास करण्यात व्यस्त आहेत. एसीपीच्या म्हणण्यानुसार, सीसीटीव्हीच्या आधारे हा अपघात कोणत्या वेळी आणि कोणत्या कारणामुळे झाला, याची माहितीघेत आहेत.